

श्री साईबाबा

…म्बर ) मूल्य ६० पैसे १९७८

## श्रीसाईनाथ स्मरणिका

### जाहिरातदारांना सुवर्णसंधी

श्रीसंत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांचा साठावा निर्वाण महोत्सव येत्या विजयादशमीस येत आहे. हा सोहळा जगभर सर्वत्र साजरा होणार आहे. श्रीसाईबाबा संस्थान शिरडीने या निमित्त दोनशे पानांची मोहक, सचित्र व संग्राह्य अशी स्मरणिका प्रसिद्ध करण्याचे निश्चित केले आहे. ही स्मरणिका साईभक्तांना सप्रेम भेटीदाखल दिली जाणार असल्याने तिच्या सुमारे २५ हजारावर प्रती काढल्या जातील. या स्मरणिकेत भारतातील ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा साईभक्तांचे, संस्थान हितचिंतकांचे श्रीबाबांच्यावरील वाचनीय लेख, शुभाशिष, संदेश इ. विविध असे उपयुक्त साहित्य असून काही पाने साईभक्तांच्या साहित्यासाठी राखून ठेवली आहेत. ही स्मरणिका भारतात व परदेशातही प्रसारित होईल.

या स्मरणिकेतील काही पाने खास जाहिरातीसाठी राखून ठेवली जाणार असल्याने साईभक्त उद्योगपती, व्यवसायबंधू, कारखानदार यांनी आपापल्या मालाच्या जाहिराती त्वरीत पाठवून आपली जागा आरक्षित करावी. जाहिराती पाठविण्याची अखेरची तारीख ३० सप्टेंबर १९७८ ही आहे. **स्मरणिकेचा आकार ७½" × १०" असा राहील.**

साईभक्तांसाठी जाहिरातीचे सवलतीचे दर –

| | |
|---|---|
| कव्हर पान क्रमांक २ | – ८०० रु. |
| कव्हर पान क्रमांक ३ | – ६०० रु. |
| कव्हर पान क्रमांक ४ | – १००० रु. |
| आतील मजकूराचे पूर्ण पान | – ५०० रु. |
| अर्धे पान | – २५० रु. |
| एक चतुर्थांश पान | – १२५ रु. |

जाहिरातीचा मजकूर, ब्लॉक्स इ. सर्व साहित्य पाठविण्याचे पत्ते—

१) साईनाथ स्मरणिका, द्वारा श्री कोटेरिसिंहरसाहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. ४२३१०९

२) श्रीसंपादक 'साईनाथ स्मरणिका,' साईनिकेतन, ८०४, बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुं. ४०० ०१४

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

जरी वेदवेदांग अध्ययन ।
केलें श्रुतिशास्त्र पारायण ।
गुरुकृपेवीण नाहीं ज्ञान ।
इतर तो शीण केवळ ॥ १७ ॥

अव्यक्तादि स्थावरान्त ।
हा संसार वृक्ष अति विस्तृत ।
जन्ममरण शोकाकुलित ।
दृष्टजात नाशिवंत ॥ १८ ॥

छेद आणि नाशयुक्त ।
म्हणोनि यासी वृक्ष वदत ।
तो हा अव्यक्त स्थावरान्त ।
वृक्षोपमित संसार ॥ १९ ॥

तो हा दृष्ट नष्टस्वरुप ।
उर्ध्वमूळ संसार विटप ।
जयाचा अपार शाखाव्याप ।
नाकळे अल्पही कवणा ॥ २० ॥

क्षणामागे क्षण लोटे ।
तैसा हा पसरे फुटती फाटे ।
कधीं दुरुन रमणीय वाटे ।
आलिंगितां कांटे सर्वांगीं ॥ २१ ॥

–श्रीसाईसच्चरित अध्याय ३२ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] सप्टेंबर १९७८ [ अंक ६.

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी „ )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३२ ६१

# श्री साईसेवा श्रेय नामावली–सप्टेंबर १९७८


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | — मी कोण ? |
| २) | श्री रामकृष्ण महाराज जांभेकर | — श्री. सुरेश सातपुते |
| ३) | गाठी–भेटी –श्रीमती मणि साहुकार | — सदानंद चेंदवणकर |
| ४) | ओळख | — डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ५) | गणेश शरणं, शरणं साईशः | — डॉ. अनिल जायस्वाल |
| ६) | तुमचे साईविषयक सामान्य ज्ञान किती आहे | — श्री. माधवराव गोरे |
| ७) | सद्गुरु साई साधना | — श्री. सूर्यकांत गर्जे |
| ८) | चिंचवडची श्री मंगलमूर्ती | — श्री. रमाकांत पंडित |
| ९) | अनादी अनंताकडे | — श्री. अनिल रसाळ |
| १०) | माझा जो आहला... | — सौ. शशिकला रेवणकर |
| ११) | आत्मसमर्पण | — कु. प्रज्ञा सबनीस |
| १२) | श्रीसाई समर्था | — सौ. सुशिलाबाई हजारे |
| १३) | साई तुझ्या भेटीसाठी | — कु. सुधा अ. शिवलकर |
| १४) | साईची मंगलमूर्ती | — कु. शालिनी स. देशपांडे |
| १५) | साई गणेश | — सौ. आशा दयानंद इंगळे |
| १६) | घे साई दर्शन | — श्री. व्ही. एस. आकेरकर |
| १७) | ऋतुचक्र | — श्री. जगदीश देवपूरकर |
| १८) | महात्मा | — शशिकला साळगावकर |
| १९) | शिरडीवृत्त–माहे जुलै १९७८ | — |

## संपादकीय —

स. न. वि. वि.

# मी कोण ?

भारतवर्षात जन्म घेणे यासारखी भाग्याची गोष्ट नाही. ती पुण्यभूमी आहे. ऋषी, मुनी, द्रष्टे यांचे हे निवासस्थान. आपल्या तीव्र तपश्चर्येने सत्यं, शिवं, सुंदरम् या परमतत्वाला पोचलेले महान सत्पुरुष याच भूमीत निपजले. त्यांना झालेला निरतिशय आनंद उपनिषदरुपी मंजुळ गानाने याच भूमीत प्रथम उमटला व आज जगात भारतवर्षात आपले मस्तक उन्नत करून उभा आहे तो त्यांच्याच पुण्यबलावर.

सर्व जीवमात्र नेहमी दुःखरहित सुखाची लालसा करतात. सुखाची लालसा हे प्रीतीचे कारण होय. पण ते सुख मिळविण्यासाठी स्वतःचे स्वरूप जाणणे आवश्यक आहे त्यासाठी " मी कोण ? " हा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

" मी " कोण ? सप्तधातूंनी बनलेला हा स्थूल देह " मी " नाही. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाच विषयांचे ग्रहण करणारी कर्ण, त्वचा, नेत्र, जिव्हा आणि नासिका ही पंच ज्ञानेंद्रिये म्हणजे " मी " नव्हे. त्याचप्रमाणे पंचविध कार्ये करणारी वाणी, पाय, हात, नाक आणि उपस्थ ही पंचकर्मेंद्रिये. म्हणजेही " मी " नव्हे. श्वासादि पंचक्रिया करणारे प्राणादी वायुपंचही " मी " नव्हे. विचार करणारे मनही " मी " नव्हे. सर्व विषय आणि वृत्ती सोडून फक्त विषयवासनांच्या संगात राहणारे अज्ञानपण " मी " नाही. याप्रमाणे " मी हे नाही " " मी ते नाही " असे म्हणून वरील सर्व उपाधींचा निरास केल्यावर जे एकमात्र चैतन्य अवशेष राहते, तेच " मी " आहे ! या चैतन्याचे स्वरूप सत्–चित्–आनंद हेच होय.

सर्व जाणण्याचे साधन आणि सकल वृत्तीचे कारण मन आहे म्हणून त्याचा जेव्हा लय करण्यात येतो तेव्हाच जगदृष्टी सुटते हे निश्चित. मन ही आत्मस्वरूपात असलेली अपूर्व शक्ती आहे. सर्व वृत्ती मनच निर्माण करते. परंतु सर्व विचार काढून टाकले की मन अशी वस्तूच शिल्लक रहात नाही. विचार म्हणजेच मनाचे स्वरूप. विचार बंद झाले की जगत् अशी अन्य वस्तूच उरत नाही. सुषुप्तींना विचार नसतात, म्हणून जगत्‌ही नसते. जागृतीत आणि स्वप्नात विचार असतात, म्हणून जगत्‌ही असते. कोष्टी ज्याप्रमाणे आपल्या आतून तंतू काढून जाळे विणतो आणि परत ते आपणातच सामावून टाकतो त्याप्रमाणे मन आपल्या आतून जगत् दृश्यमान

करते आणि आपणातच ते ओढून नेते. मन नेहमी स्थूल वस्तूंचा आश्रय घेऊनच टिकू शकते. ते स्वतः होऊन टिकू शकत नाही. या मनालाच सूक्ष्म शरीर किंवा जीव असेही म्हणतात.

या देहात ' मी ' रूपाने जे प्रगट होते तेच खरोखर मन होय. देहात कोणत्या ठिकाणी ' अहंविचार ' प्रथम स्फुरतो याचा विचार आता करूया. वस्तूतः हृदय हेच मनाचे जन्मस्थान आहे. मनामध्ये उठणाऱ्या सर्व विचारात ' अहं ' हा विचार हाच प्रथम विचार आहे. हा जागृत झाल्यावरच दुसरे असंख्य विचार जागे होतात. प्रथम पुरुष ' मी ' दिसल्यावरच द्वितीय आणि तृतीय पुरुष ' तू ' आणि ' तो ' हे दिसू लागतात. प्रथम पुरुषाशिवाय द्वितीय आणि तृतीय पुरुष टिकू शकणार नाहीत.

' मी कोण ' अशी विचारणा केल्याने खात्रीने मनाचा लय होतो. शव जाळणारी चिता प्रज्वलीत करण्यासाठी जी काठी वापरावी तीच जशी शेवटी जळून जाते, त्याचप्रमाणे ' अहं ' हा विचार दुसऱ्या सर्व विचारांचा ध्वंस करून स्वतःच नष्ट होतो. " मी कोण ? " ही विचारणा चालविली की मन आपल्या जन्मस्थानात म्हणजेच हृदयात मागे वळते आणि उठलेला विचारही लय पावतो. याप्रमाणे जसजसा अभ्यास वाढत जातो, तसतशी आपल्या जन्मस्थानात स्थिर रहाण्याची मनाची शक्तिपण वाढत जाते. जेव्हा सूक्ष्म मन, बुद्धि आणि इंद्रिये यांचे द्वारे बहिर्मुख होते तेव्हा स्थूल नामरूपाचा भास होतो. परंतु जेव्हा मन हृदयात स्थिर होते तेव्हा नामरूप अदृश्य होते. मनाला बहिर्मुख होऊ न देता, हृदयात स्थिर करणे याला अहंमुख किंवा अंतर्मुख म्हणतात. मनाला हृदयाबाहेर भाकू देणे याला बहिर्मुख म्हणतात. जेव्हा मन हृदयात स्थिर होते तेव्हा सर्व विचारांचे मूळ जे 'मी' ते अदृश्य होते. वस्तूतः यालाच मौन म्हणतात. मौनाच्या या स्थितीचे दुसरे नाव " ज्ञानदृष्टी " हे आहे आणि त्याचा अर्थ आत्मस्वरूपात मनाचा लय करणे हा आहे. याच्या उलट दुसऱ्याचे मन जाणणे, त्रिकालदर्शी ज्ञान मिळवणे, दूर ठिकाणी होणाऱ्या घटना जाणणे इत्यादींना ज्ञानदृष्टी म्हणता येत नाही.

मनाचा लय करण्यासाठी आत्मविचाराशिवाय दुसरा कोणताही योग्य उपाय नाही. अन्य उपायद्वारा जर मनाचा लय करण्यात आला, तर लय पावलेले मन परत उसळून बाहेर येते. प्राणायामाच्या योगे मनाचा निग्रह होतो, परंतु जोपर्यंत प्राणाचा विरोध करण्यात येतो तोपर्यंतच मनाचा निग्रह टिकतो. ज्यावेळी प्राणायाम थांबविण्यात येतो, त्यावेळी मन बहिर्गामी होऊन वासनेला वश होते आणि इतस्ततः भ्रमण करते. मनाचे आणि प्राणाचे जन्मस्थान एकच आहे. विचार मनाचेच स्वरूप आहे. ' अहं ' विचार हा मनाचा प्रथम विचार आहे आणि वस्तुतः तोच अहंकार

होय. जेथून अहंकार जन्म पावतो तेथूनच श्वास उद्भवतो. म्हणून जेव्हा मनाचा लय होतो, तेव्हा प्राणाचाहि लय होतो आणि जेव्हा प्राणाचा लय होतो, तेव्हा मनाचा लय होतो. परंतु भर झोपेत मनाचा लय होत असताहि प्राणाचा लय होत नाही. मरणकालपर्यंत मन प्राणाला देहात धारण करून ठेवते आणि मरणकाली प्राण घेऊन ते प्रयाण करते. म्हणून केवळ मनोनिग्रह करण्यासाठी प्राणायाम सहायरूप होतो खरा, परंतु त्याने मनोनाश होऊ शकत नाही.

प्राणायामासारखीच मूर्तिध्यान, मंत्रजप आणि आहार नियमन ही साधने साहाय्यकारी आहेत. मूर्तिध्यान आणि मंत्रजप यांच्या योगाने मन एकाग्र होते. जेव्हा मन असंख्य विचारात विभक्त होऊन राहते, तेव्हा त्याचा प्रत्येक विचार अति बलहीन होत जातो. याच्या उलट, एकेक विचार जसजसे नष्ट पावत जातात, तसतसे मन एकाग्रता प्राप्त करून बलवान् होत जाते आणि त्याला आत्मविचार सुलभ होतो.

ईश्वर आणि सद्गुरु वस्तुतः वेगळे नाहीत. आत्मविचाराशिवाय दुसरे जे विचार उठतात त्यांना लवलेशहि स्थान न देता आत्मनिष्ठेत मग्न होऊन राहणे यालाच स्वतःस ईश्वरार्पण करणे किंवा सद्गुरुला शरणागत होणे असे म्हणतात. ईश्वरावर वाटेल तेवढा भार टाकला तरी तो सर्व भार वाहून नेतो. आगगाडी सर्वांचा भार वाहून नेते असे जाणूनहि, आपण तींत बसून प्रवास करताना आपले बोचके कोठेतरी बाजूस ठेवून आराम करण्याऐवजी ते बोचके आपल्या डोक्यावर धारण करण्याचे कष्ट का करावे ?

ज्याला अविनाशी सुख म्हणतात ते वस्तुतः आत्मस्वरूपच आहे. आपण सांसारिक वस्तूपैकी एखाद्या वस्तूत जे सुख मानतो ते खरे सुख नाही. आपल्या अविवेकी विचारामुळेच त्या वस्तूमध्ये आपण सुख मानीत असतो. जेव्हा मन बाहेर भ्रमण करते, तेव्हा त्याला दुःखाचा अनुभव येतो. खरी गोष्ट अशी आहे की, जेव्हा आपल्या कामना पूर्ण होतात तेव्हा मन निश्चयपूर्वक यथास्थानात मागे फिरते व त्यामुळेच ते आत्मसुखाचा अनुभव घेते. सुषुप्ति, समाधि आणि मूर्च्छासमयी मन अन्तर्मुख होते आणि त्या समयापुरता मन आत्मसुखाचा अनुभव घेते; याप्रमाणे आत्मस्वरूपाचा त्याग करून बाहेर भटकणे आणि परत आत येणे असा मनाचा अनंत आणि कंटाळवाणा क्रम चाललेलाच असतो.

झाडाच्याखाली सावलीत सुख आहे. बाहेर सूर्याचा कडक ताप आहे. बाहेरच्या उन्हाच्या तापाने त्रासून छायेमध्ये गेल्यावर माणसाला शीतलतेचा अनुभव येतो. थोडा वेळ तेथे राहून परत तो बाहेर येतो, पण कडक ताप सहन न

झाल्यामुळे पुनः झाडाची छाया शोधतो. या प्रमाणे सावलीतून उन्हातापात आणि उन्हातून सावलीत ये जा चालूच असते.

सूर्याच्या इच्छा, संकल्प किंवा यत्नाशिवाय ज्याप्रमाणे त्याच्या किरणातील उष्णतेने सूर्यकांतमणि अग्नि निर्माण करतो, कमळ विकास पावते, पाणी आटते, पृथ्वीवरील लोक आपापल्या कार्यात प्रवृत्त होतात आणि परत विराम पावतात, आणि ज्याप्रमाणे लोहचुंबकासमोर धरलेली सुई नाचू लागते, त्याप्रमाणे कर्माधीन असलेले जीवमात्र आपापल्या कर्मानुसार कार्य करतो आणि नंतर निश्चेष्ट पडतो. त्याप्रमाणे सूर्याला लोकांच्या कर्मांचा स्पर्श होत नाही आणि सर्वव्यापी आकाशाला चार भूतांचे गुणअवगुण लागत नाहीत, त्याप्रमाणे व्यक्तिमात्राच्या आत्म्याला कोणत्याहि कर्माचा स्पर्श होत नाही.

सर्व शास्त्रे म्हणतात की मुक्ति मिळविण्यासाठी मनाचा निग्रह केला पाहिजे. मनोनिग्रहासाठी "मी कोण ?" ही विचारणा केली पाहिजे, पण शास्त्रद्वारा ती कशी करता येईल ? खरे पाहिले असता, आपण स्वतःस ज्ञाननेत्राने जाणले पाहिजे. मी राम आहे हे जाणण्यासाठी रामाला आरशाची जरूरी लागते काय ? जो 'मी' म्हणतात तो पंचकोशाच्या आत आहे, पण शास्त्रे आहेत पंचकोशाच्या बाहेर ! बंधनात कोण आहे याचा विचार करून आपले यथार्थ स्वरूप जाणणे हीच मुक्ति होय.

जो कचरा झाडून फेकून द्यावयाचा असतो, त्याची तपासणी करण्याचे जसे प्रयोजन नसते, तसेच ज्याला स्वतःचे स्वरूप जाणण्याची इच्छा आहे, त्याने स्वस्वरूप झाकणारी तत्त्वे गोळा करून फेकून देण्याऐवजी ती सर्व मोजत बसणे किंवा त्यांचे गुणदोष तपासीत बसणे हेहि निष्प्रयोजन आहे.

जाग्रतावस्था दीर्घ असते व स्वप्नदशा क्षणिक असते; याशिवाय या दोहोत दुसरा भेद नाही. जाग्रतीत होणारे सर्व व्यवहार ज्या प्रमाणात सत्यासारखे भासतात, त्याच प्रमाणात स्वप्नात होणारे व्यवहार त्या समयापुरते सत्यच भासतात.

शुभ मन आणि अशुभ मन अशी दोन मने नाहीत. मन एकच आहे. मात्र वासना शुभ अशुभ अशा दोन जातींची होत असते. शुभ-वासनायुक्त मन अशुभ म्हणतात. दुसरे लोक कितीहि वाईट असे दिसत असले तरी त्यांचा द्वेष करू नये. राग आणि द्वेष या दोहोंचा त्याग करावा.

जेव्हा अहंभाव उद्भवतो, तेव्हा सर्व काही निर्माण होते. जेव्हा अहंभावाचा नाश होतो, तेव्हा सर्व काही विलय पावते. आपले हेच अंतिम 'श्रेय' होय. ●

## ॥ श्री गणेशाय नमः ॥



गणानां त्वा गणपतिं हवामहे
कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत
आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ॥

(ऋ. २. २३.१)

अर्थ —

समुदायांचा प्रभू म्हणून तू गणपती. ज्ञानी जनात तूच अत्यंत ज्ञानी. कीर्तिवंतांमध्ये तू वरिष्ठ. तूच राजाधिराज. तुला आम्ही आदराने बोलावितो. तू आपल्या सर्व शक्तिसह ये आणि या आसनावर विराजमान हो.

भगवान गणेश म्हणजे साक्षात ओंकार. ज्ञानाची आणि लिखाणाची आद्य देवता. लेखनात अग्रपूजेचा मान त्याचा. म्हणूनच श्रीगणेशाला वंदन करून नंतरच लेखनाला सुरुवात करायची ही पुरातन कालापासून चालत आलेली प्रथा. 'आधी वंदन गजानना — आधी गजाननाचे पुण्यस्मरण; मगच लेखणीची करामत.

वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥ — सुखकर्ता, दुःखहर्ता असाही गणपतीचा लौकिक. त्यासाठीही प्रथम त्याचे स्मरण व पूजन. आणि नंतरच कार्याचा आरंभ.

श्री गजानन म्हणजे ओम्‌काराचंही दृष्य रूप. ओम्‌काराला साकार करणारं त्याचं ध्यान. म्हणूनही त्याचा मान पहिला.

प्रत्यक्ष श्री विनायक लेखनिक झाले म्हणूनच मानवी जीवनाचे अक्षय्य तत्त्वज्ञान मांडणाऱ्या महाभारतासारख्या अद्वितीय ग्रंथराजाचे लेखन वेदव्यासांना शक्य झाले. साऱ्या ऋषी-मुनींनी ह्यालाच आधी प्रसन्न करून घेतले आणि लेखणी उचलली आणि दुनियेसाठी ज्ञानामृत पुरवणारी चिरंजीव वचनं लिहून ठेवली. अशा ह्या आदिदेवता श्रीगजाननाच्या आराधनेचा महिना म्हणजे भाद्रपद मास म्हणूनच त्यांचे स्मरण करून त्याला प्रथम वंदन करूया !

॥ ॐ गं गणपतये नमः ॥
॥ ॐ भूर्भुवः स्वः महागणपतये नमः

" मधुरा भक्तीत रंगलेले समर्थ भक्त "

# श्री रामकृष्ण महाराज जांभेकर

— श्री. सुरेश सातपुते
लालबाग, मुंबई १२

● झुक ऽऽ झुक आवाज करीत ती लोकल " पार्ले " स्टेशनात शिरली.

१९३७ सालच्या " त्या " सायंकाळी लोकल्सना आजच्या सारखी भाऊगर्दी नव्हती. जेमतेम दहा–वीस टकली — अगदी ऑफिसेस सुटण्याची वेळ असून सुद्धा एखाद्या डब्यात दिसली तरी गर्दीच म्हणावयाची !

गाडी थांबली तसा ऐसपैस पसरून 'रागदरीत' ताना मारणारा दिनकर अगदी संथ पावले टाकीत गाडीतून उतरला, आणि आपल्याच तंद्रीत रस्त्याला लागला...

दिनकरला शास्त्रोक्त संगीताचे खूप वेड होते – आणि ज्ञानही होते. चालता चालता तो एका बंगल्यापाशी थबकला. अत्यंत मंजूळ स्वरात कोणीतरी गात होते. तो गानवेडा तरुण त्या जादूमई आवाजाने भारल्याप्रमाणे त्या बंगल्यापाशी खेचला गेला. त्याची पावले अजाणत्या दरवाज्याच्या दिशेने पडू लागली. अखेरीस सामाजिक नियम धाब्यावर बसवून तो आत डोकावलाच. कोणी पट्टीचा गवई कृष्ण कन्हैयाचे गाणे गात होता आणि अलंकाराने नखशिखांत सजलेली एक तेजस्वी नर्तकी नृत्य करीत होती. जनलज्जेची पर्वा न करीता तो तेथेच खिळून उभा राहिला. नर्तकीची त्याची नजरानजर झाली. तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटले, पण हा प्रकार तेवढ्यावरच थांबला नाही. पुन्हा देखील ज्या ज्या वेळी नजरेस नजर भिडे त्या त्या वेळी ती नृत्यांगना स्मित करी. हा प्रकार आणखी किती वेळ चालला असता देव जाणे. पण गाणेच संपले ! तेव्हा तर अवाक् होण्याची पाळी दिनकरवर आली. कारण ती नृत्यांगना त्याला चक्क आत बोलवीत होती—

" बाळा नाव काय तुझं ? "

" दि–न–क–र ", दिनकरच्या तोंडून नकळत उत्तर निसटले.

" तुझ्याजवळ स्वामी समर्थांचा फोटो आहे ना ? "

" होय ! " दिनकर उद्गारला.

## श्री रामकृष्ण महाराज जांभेकर



महाराज स्वतःच्या प्रसिद्धीच्या अगदी विरुद्ध होते! त्यामुळे त्यांनी जिवंतपणे स्वतःचा फोटो कधीच घेऊ दिला नाही. देहत्यागा नंतरचा त्यांचा उपलब्ध असलेला हाच तो एकमेव फोटो.

"तुझी मोठी बहीण खूप देखणी होती ना ? ती तुम्हाला सोडून गेली!" अरेच्च्या ! ही नृत्यांगना तर मनकवडी देखील दिसते. खरोखरीच ती सारेच काही जाणत असावी. दिनकरला आश्चर्य वाटले, पण आश्चर्याचा मोठाच धक्का त्याला अद्याप बसावयाचा होता. आणि तो बसला —

नर्तकीने एकाएकी डोक्यात हात घातला आणि मस्तकावर बेमालूम बसविलेला केसांचा टोप काढून बाजूला ठेवला. क्रमाक्रमाने अंगावरील अलंकार उतरविण्यास सुरवात केली. अखेरीस तिने स्वतःचे लुगडेही फेडले —

— आणि दिनकरसमोर उभा राहिला एक निरंजन लंगोटीधारी संन्यासी !

दिनकरचे डोळे विस्फारले. आयुष्यात इतका मोठा आवाक् करणारा प्रसंग तो प्रथमच अनुभवित होता.

ते होते **श्री रामकृष्ण महाराज जांभेकर !**

×　　　　×　　　　×

स्वतः महाराज अक्कलकोटच्या श्रीस्वामी समर्थांच्या मधूरा भक्तीत रंगलेले होते. मधूरा भक्ती हा भक्तीचा एक विलक्षण प्रकार असून त्या योगे ईश्वराशी त्वरीत अनुसंधान साधता येते. मधूरा भक्ती म्हणजे ईश्वराशी कुठलेही नाते जोडून त्या भावात राहणे होय. ज्याप्रमाणे मीराने श्रीकृष्णाशी प्रियकराचे नाते जोडले, भ. रामकृष्ण परमहंसांनी कालीमातेशी आईचे नाते जोडले, त्याप्रमाणेच श्री रामकृष्ण महाराजांनी अक्ककोटच्या स्वामी समर्थांशी आजोबांचे नाते जोडले होते. देव आणि भक्त असा विभक्तपणाचा भाव मधूरा भक्तीत मुळातच नसल्यामुळे व ईश्वरास आपल्या हक्काचा माणूस समजल्याने ईश्वराशी अधिक जवळीक होते. या बाबतीत आग्रीपाडा येथे राहणाऱ्या ताईंचे उदाहरण देता येईल. त्यांनी साईबाबांशी बहीणीचे नाते जोडले आहे. त्यामुळेच त्यांच्याकडील साईबाबा हे "ताईंचे साईबाबा" म्हणून अनेकांना ज्ञात आहेत. असो, पण जांभेकर महाराजांशी – त्यांचे आजोबा बोलत. महाराजांपाशी अडअडचणी निवारण्यासाठी जे लोक येत त्यांना महाराज कधी कधी आजोबांना विचारून सांगतो असे उत्तर देऊन टाकीत. त्यांच्या अडचणींचे निवारण झाल्यानंतरही त्याचे श्रेय ते आपल्या आजोबांना देऊन मोकळे होत, व स्वतःकडे अकर्तेपणा ठेवीत. हा महाराजांच्या स्वभावाचा एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू होता, यात शंका नाही. कोणी केले ? — आजोबांनी केले ! कसे झाले ? — आजोबांच्या कृपेने झाले ! अशी अलिप्तपणाची त्यांची उत्तरे असत.

असे असले तरी महाराज कधी कधी देवी भावांतही आत. त्यावेळी स्त्रियांनी वापरण्याचे सुकले अलंकार ते अंगावर चढवित व नटून सजून राहत. यावरून वरील प्रसंगी महाराजांनीच देवी भावात आऊन नृत्य केले. ही गोष्ट वाचकांच्या लक्षात

आलीच असेल. अशावेळी महाराज घागरी फुंकीत. कधी कधी ही घागर कुंकवाने भरून जाई मग ते कुंकू उपस्थित भक्तांना प्रसाद म्हणून वाटण्यात येई. त्यामुळे महाराजांना अर्पण करण्याच्या वस्तूत लुगडी देखील असत. ही जमलेली लुगडी महाराज गोर-गरीब स्त्रियांना वाटून टाकीत. अशी हजारो लुगडी महाराजांनी त्या काळी वाटली.

पण ! एवढ्यानेच कुठे होते – महाराज रमझान महिन्यात "रोझे" देखील पाळीत. त्यावेळी पाण्याच्या थेंबासही स्पर्श करीत नसत. यावरून सर्व धर्म एकच आहेत, असे ते मानीत हे स्पष्ट होते.

× × ×

ती पेटी लांबूळकी होती... किरीस्तावांच्या शवपेटीकेसारखीच ! पण किरीस्तावांच्या शवपेटीकेचा आकार पायाकडे व डोक्याकडे निमुळता होत जातो तशी ती नव्हती. ती होती आयताकृति ! मोजमापातच सांगायचे झाले तर ती सहा फूट लांब, २ फूट रुंद व २ फूट उंच अशी होती, आणि विशेष म्हणजे ती हवाबंदही होती. महाराज लहरीत आले म्हणजे कधी कधी त्या पेटीत जाऊन झोपत व बाहेरून कुलूप लावण्यास सांगत. अर्थात् पेटी उघडण्याचा दिवस–वेळ त्यांनी अगोदरच सांगितलेली असे. अशा रितीने कधी कधी चाळीस ते बेचाळीस दिवसही ते त्या पेटीतच असत.

यावरून महाराज केवल कुंभक साधण्यात निष्णात होते, हे उघड आहे.

एकदा तर महाराजांनी कहरच केला. एका भक्ताला घेऊनच त्याच्यासह ते या पेटीत झोपले.

× × ×

"बाप तसा बेटा" ही म्हण कधी कधी खोटी ठरते. मुलगा बापाच्या अगदी उलट स्वभावाचा निघतो. महाराजांचे वडील अंताजी हे थोडेसे आळशी... कामधंदा न करणारे होते. ते मूळचे राजापूर तालुक्यातील पोंबुर्ले गावचे ! पण नाटकात काम करण्याची आवड ! त्यामुळे ते नाटक कंपनीत नोकरीस राहिले. आणि कंपनीबरोबर प्रवास करीतच ते गुजरातेत गेले. पुढे पुढे ते अगदीच दैववादी बनले व कंपनी सोडून "देईल खाटल्यावर" या वृत्तीने घरीच राहू लागले.

पण नवऱ्याला बायकोची काळजी नसली तरी भावाला बहीणीची काळजी करावीच लागते. मेहूणे उद्योग करीनात म्हणून अंताजीरावांना त्यांच्या मेहूण्यांनी मुंबईत आणले आणि तिथेच — मामांच्या घरी श्री रामकृष्णांचा जन्म १८९८ साली झाला. अर्थातच महाराजांचे बालपण मुंबईतच गेले. ५ व्या इयत्तेपर्यंत ते आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत शिकत होते. पुढे मामा निवृत्त झाले व

शेतीवाडी घेऊन "पारडी "स राहू लागले. त्यामुळे महाराजही पारडी येथे वाढू लागले. महाराजांची मुंज झाली. महाराजांना मंत्र मिळाला —

**" ॐ भुर्भुवःस्व तत्सवितुर वरेण्यं, भर्गो देवस्य धिमही धियो योनः प्रचोदयात ॥ "**

सोनाराने नळी फुंकली पण वारे इकडे तिकडे नाही गेले ! दुसऱ्या कानाने बाहेर पडण्याऐवजी ते ब्रह्मरंध्राशी मार्गस्थ झाले...नखशिखांत भिनले !

मुंजीत मिळालेल्या मंत्राचे चिज करणारा असा एकादाच ! महाराजांची गायत्री मंत्रावरील श्रद्धा अफाट होती. अगदी अंतकाळपर्यंत ते हाच मंत्र जपत होते.

× × ×

कुत्र्याचे शेपूट जसे वाकडे तसे कुत्र्याचे एकमेकाशी देखील वाकडेच ! परका कुत्रा पाहिला की, हाडवैऱ्याप्रमाणे एकमेकांवर तुटून पडणे हा त्यांचा जणु धर्मच !

महाराज म्हटले की कुत्री जवळ असायचीच ! या नियमानुसार रामकृष्ण महाराजांपाशी देखील एक कुत्रे होते. हे कुत्रे एकदा मठासमोरच भटकत होते. इतक्यात कुठूनसे एक दुसरे कुत्रे आले आणि बस्‌ – एकमेकावर तुटून पडले. त्या झोंबीत —

महाराजांच्या कुत्र्याची बुबुळेच बाहेर पडली ... अक्षरशः जमिनीवरच ! ही गोष्ट महाराजांच्या लक्षात आली तेव्हा तिथे एक कंपाऊंडर बसलेले होते. त्यांना महाराज म्हणतात —

" अरे भाऊ ! ते डोळे उचल आणि जागच्या जागी शिवून टाक ! " राजाराम भाऊंनी त्याप्रमाणे ते डोळे धुवून वगैरे जाग्यावर बसवून शिवून बँडेज बांधले. आणि चार दिवसानी बँडेज काढल्यानंतर कुत्र्यास दिसू लागले !

१९३८ साली शल्यक्रियेचे तंत्र आजच्या इतके प्रगत देखील नव्हते, अशा काळात एका मामुली कंपाऊंडरने हे काम यशस्वी रितीने करावे हा महाराजांचा सिद्धवाणीचाच प्रताप नाही काय ?

× × ×

तारूण्यात पदार्पण केल्यानंतर महाराजांनी पोस्टात नोकरी धरली. शिक्षण कमी म्हणून पत्र वाटपाचे मामूली काम त्यांना करावे लागे. हे सगळे अगदी वर वर चाले. पण सारे लक्ष मात्र उपासनेकडेच. संध्याकाळी कामावरून परतल्यावर, लोक घरी गर्दी करीत. त्यांना महाराज सल्ले देत. कुणाला तोडगे सांगत ... कुणाला उपासना सांगत ... असा दिनक्रम चाले.

याच दरम्यान त्यांचे लग्नही झाले. पुन्हा मूलही झाले! तसं पाहता सारेच काही सामान्य माणसाप्रमाणे चालले होते. पण — अंतरीची साधना मात्र २४ तास चालूच असायची.

एकदा महाराज भायखळ्याच्या पॅलेस चित्रगृहात कोणाच्या तरी आग्रहावरून गेले! सारे लोक सिनेमा पाहून उठले ... तो महाराज दोन्ही पाय खुर्चीवर घेऊन नामजपाच्या तंद्रीत बसलेले आढळले.

नंतरच्या काळात महाराज नोकरी सोडून पंजाबात मेहुण्यांकडे गेले. तिथेच त्यांची बायको व मूल निवर्तले. अशा रितीने आघात झाल्यावर महाराज दुःखाने विव्हळ झाले...त्यातच त्यांना पूर्ण वैराग्य प्राप्त झाले, आणि भटकंती करीत ते पुन्हा गुजरातेत आले.

मन भरकटले म्हणजे सारासार विवेक नाहीसा होतो. तेच महाराजांच्या बाबतीत घडले. अत्यंत निराश होऊन आत्महत्याच करावी या उद्देशाने ते एका तळ्यापाशी गेले व उडी टाकणार इतक्यात—

— एक पांढरट पण धूसर दिसणाऱ्या आकृतीने त्यांचा हस्त धरीला आणि जवळ जवळ ओढतच त्यांना जवळच असलेल्या सय्यद बाबांच्या दर्ग्यापाशी नेले. आणि त्या दर्ग्यातच ती छाया...ती माया अदृश्य झाली. पण त्या छोट्या प्रवासात त्या धूसर छायेने त्यांची आत्महत्याच टाळली नव्हती, तर—

मायेत गुरफटलेले त्यांचे " स्वयंभुत्व " त्यांना उलगडून दिले होते. हा काळ होता १९३०. आणि त्यानंतर केवळ दहाच वर्षे महाराजांनी कार्य केले. आणि १९४० साली त्यांनी देहत्याग केला.

× × ×

सय्यद बाबांनी केलेल्या जागृतीनंतर महाराज निघाले ते गुजरातेतच थेट सुरतेच्या स्मशानात येऊन बसले. जाणारे येणारे या वेड्या फकीरास पहात, पण सुरवातीस कोणी त्यांची फारशी दखल घेतली नाही.

पण हिरा कधी लपत नाही. हळू हळू चमत्कार घडू लागले आणि लोक येऊ लागले. मुंबईची काही मंडळी कामानिमित्त सुरतेस गेली होती. त्यांच्या कानावर महाराजांची किर्ती पडली. ते मोठ्या कुतुहलाने महाराजांपाशी गेले. प्रथम दर्शनातच भारावून म्हणाले—

" महाराज ! आपण आमच्याबरोबर मुंबईला याल का ? "
" होय ! पण माझ्यापाशी पैसे कुठे आहेत ? " महाराज उत्तरले.
" आम्ही नेऊ तुम्हाला तिकडे ! सारी सोय लावू. मग तर याल की नाही ? "
— आणि महाराज मुंबईस आले !

महाराज सुरवातीस प्रभादेवीला एका घरात राहत. हे घर भुताटकीने झपाटलेले आहे असा फारच मोठा प्रवाद होता. पण या कलंदरास त्याचे काय ? स्मशानात निःसंग राहणाऱ्यापुढे भुतांच्या बंगल्याचा काय पाड ? पण महाराज जास्त दिवस तेथे राहिले नाहीत. तेथून ते फकीरशेठच्या बंगल्यात राहावयास गेले. हे घर देखील प्रभादेवीसच भूतबंगल्याच्या जवळपासच होते. तिथेच महाराजांचे वास्तव्य अखेरपर्यंत होते. म्हणून त्या घरास पुढे " मठ " अशी संज्ञा प्राप्त झाली.

× × ×

तो मुसलमान होता. त्याचा आफ्रिकेत मोठाच व्यापार होता. पण खोट आली ! देणेदारास चुकविण्यासाठी हा तोंड घेऊन पळाला तो थेट मुंबईस आला. योग होता म्हणून महाराजांची गाठ पडली. त्याने गाऱ्हाणे मांडले—

महाराज म्हणाले— तू केलास व्यापार ! खोट आली तुला ! त्याला मी काय करू ? चल जा ! दोन दिवसानी मिटल्यावर ये ! "

खरोखरीच दोन दिवसांनी तो मेवामिठाई, हारतुरे इ० घेऊन आला. त्याचे पैसे आफ्रिकेतील त्याच्या मित्राने भरले होते.

महाराज चालू व्यक्तींची भेपकगीरीही कधी कधी उघड करीत—

एकदा एका बाईचे कसले तरी संकट दूर झाले. ती महाराजांना त्याबद्दल धन्यवाद देऊ लागली, पण महाराजांना लहर आली—

" तू मला काय देशील ? "

" देईन पाच रुपये ! " बाई बोलून गेली.

" तर मग दे ! " महाराजांनी हात पुढे केला.

ती कां–कू करीत म्हणाली..."आता नाहीत माझ्याकडे ! मग देते ! "

महाराज ताऽऽडकन उत्तरले "तुझ्या कनवटीस आता पैसे आहेत त्याचे काय ?"

— बाईने निमूटपणे नोट काढून दिली.

× × ×

जे श्रीसाईंनी केलं...जे श्री गाडगेबाबांनी केलं. तेच श्री रामकृष्ण महाराजांनी केलं. दुःखी कष्टी रोग्यांची सेवा आणि मुक्त हस्ते अन्नदान ! महाराजांच्या मठात अन्न संतर्पण रोजच चाले. किमान अडीच तीनशे माणसे तरी जेवणास रोजची असत.

महाराज उत्सवही बरेच करीत. त्यात जन्माष्टमी, नवरात्री, दत्तजयंती, गुरुपौर्णिमा असे देवी व देवतांचे किमान आठ-दहा तरी उत्सव वर्षाकाठी होत.

पण उत्सव हे केवळ निमित्त असे. त्या मिषाने ते अन्नदानच करीत. अशा उत्सवाचे वेळी हजार पंधराशे पान अवश्य पडावयाचेच ! पण कधी कधी गंमत होई.

सारे आटोपल्यावर पाच-पंचवीस माणसे कुठूनतरी येत. जेवण जवळ जवळ संपलेले असायचे. मग महाराज आपली किमया दाखवित —

आणि सर्वांना पोटभर जेवण मिळे! जणू अन्नपूर्णाच प्रसन्न झाली आहे! –मात्र स्वतःचे अन्न महाराज माधूकरी मागूनच घेत!

× × ×

महाराजांकडे रोगाने पिडलेले–गांजलेले, अडचणीत सापडलेले लोक नित्य येत. ते त्यांना कधी कधी तोडगे सांगत ... कधी मठात येऊन राहण्यास फर्मावित ... कधी औषध देत ... कधी अक्कलकोट स्वामींची तस्वीर देऊन त्याची पूजा करण्यास सांगत. अशा रितीने ते दीन-दुबळ्यांचे रक्षणाचे कार्य करीत.

रस्त्यावर तळमळत पडलेल्या एका कुष्ठ रोग्याला एकदा महाराजांनी उचलून मठात आणले. ते स्वतः रोज त्याची स्वच्छता करीत ... औषधपाणी लावत. महाराजांच्या दीर्घ प्रयत्नानी तो पूर्ण बरा झाला. बाहेर पाठविताना महाराज त्याला म्हणाले ...

" बघ! तुला मुळीच भय नाही! पण तेलकट वडे, भजी मुळीच खाऊ नकोस! पण जीभ जिंकली त्याने जग जिंकले अशी म्हण आहे ती उगीच नाही. त्याने नको तेच केले आणि मरून गेला!

× × ×

अशा या महान सत्पुरुषाने शेवटच्या क्षणीही दुसऱ्याचे दुःख स्वतःवर ओढवून घेऊनच देहत्याग केला.

कोणी एकाच्या वडीलांस अर्धांग वायू झाला होता. त्याने महाराजांजवळ गाऱ्हाणे मांडले.

महाराज म्हणाले: "तुझ्या वडीलांचा आजार मी घेतो! दुसरे काय?" आणि काही वेळातच महाराजांचे अर्धांग लुळे पडले! अर्थात्च त्या गृहस्थाचे वडील बरे झाले होते.

या दुखण्यातच महाराजांनी १० जानेवारी १९४० रोजी वयाचे केवळ ४२ व्या वर्षीच देहत्याग केला. शेवटपर्यंत कुठलाही औषधोपचार त्यांनी स्वतःवर करून घेतला नाही.

" माझी समाधी राजपुत्राच्या समाधी शेजारी होईल " अशी वाणी महाराज केव्हातरी उद्गारले होते.

त्या प्रमाणेच महाराजांची समाधी दादर स्मशान भूमीत राजपुत्राच्या समाधी-शेजारीच आहे. त्याठिकाणी काही काळ शांत चित्ताने बसल्यास अजूनही आपल्या अस्तित्वाची जाणीव महाराज देतात.

श्रम केल्याविना खाऊ नका! असा महाराजांचा प्रामुख्याने उपदेश असे!

++++++

## श्री साईंच्या पारशी स्त्रीभक्त—
# ❀ मणि साहुकार ❀

— सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला



आज जगातील सर्व धर्मात नि जातीत श्रीसाईबाबांची भक्त मंडळी विखुरलेली आहेत. पारशी ज्ञातीत साईंची जी भक्तमंडळी आहेत त्यामध्ये मुंबईत बांद्रा येथे निवास करणाऱ्या श्रीमती मणिबेन साहुकार यांचे नाव वरच्या श्रेणीत घेतले जाते. मणिबेनचे सारे जीवन आज साईमय झालेले आहे.

साईभक्तीत दंग असलेल्या आणि आपले जीवन सर्वस्व श्री साईसेवेस वाहिलेल्या मणि साहुकार या मूळ निजाम राज्यातल्या. त्यांचा जन्म हैद्राबाद येथे १९१० साली झाला. त्यांचे वडील नसरवानजी हे कलकत्ता येथे डॉक्टर होते. त्यांचे आईचे नाव पिरोजा. मणिबेनना दोन बंधू आहेत. वडील बंधू

फिरोज हे सेंट्रल बँकेच्या डेप्युटी मॅनेजर पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत तर धाकटे बंधू जहांगीर हे अमेरिकेत नॉर्थ कॅरोलिना येथे प्राध्यापक आहेत. ते ऑक्सफर्डचे पी. एचडी. आहेत.

मणिबेनचे प्राथमिक शिक्षण हैद्राबादला व कलकत्याला झाले. दुय्यम शिक्षण मुंबईला न्यू हायस्कूल फॉर गर्ल्स सध्याचे डी. बी. पेटीट हायस्कूल येथे झाले. १९२६ साली त्या मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्या व उच्च शिक्षणासाठी त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजात नाव दाखल केले. १९३० साली त्या तत्त्वज्ञान विषय घेऊन बी. ए. पदवीधर झाल्या.

लहानपणापासूनच मणिबेनचा ओढा संगीताकडे होता आणि म्हणूनच की काय पदवीधर झाल्यावर त्यांनी संगीताचे शिक्षण घेण्याचे ठरविले. हे शिक्षण घेत असतानाच कृष्णसंगीताकडे त्या आकर्षिल्या गेल्या. भगवान श्रीकृष्णाची भक्तिपर गीते त्यांनी लिहिली व ती पुढे थॅकर्स या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केली. आजही या बाई आपला दिवसभराचा काही वेळ संगीताची रियाझ करण्यात घालवितात.

बी. ए. पदवीधर झाल्यावर दोन वर्षे मणिबेननी शिक्षिका म्हणून नोकरी पत्करली. ज्या शाळेतून त्या मॅट्रीक उत्तीर्ण झाल्या त्याच शाळेत त्या शिक्षिका म्हणून वावरल्या. इंग्रजी हा त्यांचा आवडीचा विषय होय.

संगीतातील श्री कृष्णाची भक्तीगीते गातागाताच त्या भगवान श्रीसाई-बाबांचे कडे आकर्षिल्या गेल्या, इतक्या की त्यांनी साईबाबांवर इंग्रजीतून ग्रंथरचना केली. मुंबापुरीतील भारतज्योती व संडे स्टॅंडर्ड या इंग्रजी साप्ताहिकातून त्या सातत्याने आध्यात्मिक विषयावर अधिकारवाणीने लिहू लागल्या साईबाबांचे प्रमाणेच साकोरीचे उपासनी बाबा व सती श्रीगोदावरी माता यांचेकडेही त्या आकर्षिल्या गेल्या. उपासनी बाबांचे जीवनचरित्र त्यांनी इंग्रजीतून लिहून प्रकाशित केले. 'स्वीटनेस अॅण्ड लाइट' या विषयावरचे माताजींबद्दलचे पुस्तक त्यांनी इंग्रजीत लिहिले असून त्यातून प्रामुख्याने माताजींचे जीवनदर्शन व त्यांची शिकवण प्रतीत करण्याचा त्यांनी यशस्वी यत्न केला आहे.

श्रीमती मणि साहुकारनी लिहिलेले श्रीसाईबाबांचे वरील इंग्रजी पुस्तक खूपच लोकप्रिय झाले, इतके की त्याच्या भारतात दोन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आणि कॅलिफोर्नियाच्या डॉन हॉर्स या प्रकाशन संस्थेने मुद्दाम आपला प्रतिनिधी बाईंच्या भेटीसाठी भारतात रवाना केला व त्या प्रकाशन संस्थेने अमेरिकेपुरतीच मर्यादीत स्वरुपाची अशी याच पुस्तकाची झकास आवृत्ती काढली यामुळे साईबाबा आज लंडन–अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशात जाऊन पोचलेले आहेत व त्या पुस्तकामुळे ते अनेकांचे हृदयस्थ झालेले आहेत. बाईंची ही केवढी साईसेवा आहे! आपल्या दैनंदिन कार्यक्रमास बाई श्रीसाईंच्या प्रतिमेचे दर्शनसुख घेऊन आरंभ करतात.

मणि साहुकार यांचा विवाह १९२९ साली झाला. त्यांचे पतीराज श्री. नरिमनशेट साहुकार हे गोदरेज उद्योग समूहांचे जनरल मॅनेजर आहेत. श्री. व सौ. साहुकार यांना १९४७ साली अरुणाचलमला जाण्याची संधी लाभली व तिथे साक्षात् रमणमहर्षिंनी दर्शन दिले. श्री. नरिमन साहुकार इंग्रजीचे पदवीधर आहेत. कला, धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. महाराष्ट्रातले एक श्रेष्ठ उद्योगपती म्हणून त्यांना आज मोठा मान दिला जातो. रमण भगवानांचे ते गाढे भक्त आहेत.

श्रीमती साहुकार यांची अध्यत्मिक विषयावरची तयारी लक्षात घेऊनच की काय १९७८ च्या जानेवारीत बनारस हिंदु विद्यापीठाने त्यांना खास आमंत्रण देऊन "स्पिरीच्युअल फिलॉसफी इन कल्चर ऑफ इंडिया ॲण्ड दि युनिटी ऑफ मॅनकाईंड" या विषयावर त्यांचे खास भाषण आयोजित केले होते. बाईंनी तिथे प्रदीर्घ भाषण करून सर्वच श्रोत्यांना अक्षरशः मंत्र-मुग्ध केले आज कोणत्याही अध्यात्मिक विषयावर बोलण्यास बाई नेहमीच तयार असतात. श्रीसाईबाबा, उपासनीबाबा व गोदावरी माताजी या तिघांच्या वरची त्यांची भक्ती व श्रद्धा भक्तगणांना चांगलीच अवगत आहे. या वयातही बाई इंग्रजीतून अस्खलीत तासन् तास गूढ विषयावर बोलू शकतात. चर्चा करू शकतात. श्री उपासनी बाबांची बोध वचने इंग्रजीतून पुस्तक रुपाने आणण्यासाठी त्या सध्या मेहनत घेत असतात. ❀

# ओळख

डॉ. के. भ. गव्हाणकर,
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला ७०.

● गंगेचा शीतल प्रवाह झुळझुळ वहात होता. सभोवार हिरवीगार वनराजी शोभत होती. वाल्मिकींच्या पवित्र आश्रमात सीतामाई एकट्याच बसल्या होत्या. रामरायाच्या आठवणीने त्यांचे हृदय घडीघडीला पाझरत होते. इतक्यात बाहेरून मधूर हास्यध्वनि कानी पडला. सीतामाई पहातात न पहातात तोच कुश लवांनी धावत येऊन गळ्यास मिठ्या मारल्या. "आई आज आम्ही केवढी मौज धरून आणली म्हणून सांगू ! त्यात एक शेपट्या सुद्धा आहे." सीतामाईंना प्रथम काही उमगले नाही. परंतु नंतर मात्र शंका आली. त्या आश्रमात नित्य रामायणाचा अभ्यास वाल्मिकी लव आणि कुश यांचेकडून करवीत होते, आणि रामरायाच्या भेटीचे दिवस तर आले होते ! "कोठे आहे रे ती मौज ?" आईचे शब्द ऐकून ते दोघेही धावत बाहेर गेले. थोड्याच वेळात कोणातरी दोघा व्यक्तींना ते बांधून आणित आहेत असे सीतामाईने पाहिले. त्या दोन व्यक्ती म्हणजे रामराय व लक्ष्मण आहेत असे पाहिल्यावर सीतामाईंची धांदल उडाली. त्या पंचारती घेऊन धावल्या. लवकुशांना काहीच कळेना, "बाळा ! हे तुझे वडील" सीतामाईंच्या नेत्रातून अश्रू वाहू लागले. रामरायांना बंधनातून मुक्त करून आश्रमात आणून आसनावर बसविले व त्यांची पूजा केली. लवकुशांना आपले हेच वडील कळल्यावर ते दोघेही रामरायाच्या मांडीवर चढून अंगास बिलगले व अगदी पुरातन ओळखीप्रमाणे गुजगोष्टी करू लागले ! रामरायांना ओळखले नव्हते तेव्हा त्यांच्याशी युद्ध केले, पण ओळख पटताच सलगीने लाडीगोडी करू लागले व रामरायांच्या अंकाचा आश्रय केला ! रामरायास त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते परंतु ओळख पटावयास सीतामाईचे शब्द लागले. सीतामाईंच्या शब्दांनी त्यांना जीवनाधार भेटला !

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात असेच घडत आहे. आपले जीवित्व हे प्रभूच्या अंकावर नाचत बागडत आहे. निद्रा असो, जागृती व स्वप्न असो तो प्रभु सहृदय पित्याप्रमाणे आपल्या मानेखाली हात घालून प्रिय दृष्टीने अवलोकन करीत आहे. परंतु जोपर्यंत आपणास त्याची ओळख नाही तोपर्यंत प्रभूविषयी आपलेपणा व आधार वाटत नाही. परंतु संतवचनांनी का ओळख पटली की जीविताचा केवढा पालट होतो ! जिथे अंधार तेथेच प्रकाश, जिथे परकेपणा तेथे स्नेहवत्सलता, जिथे रुक्षता तेथेच

रमणीयता, जिथे निष्ठुरता तेथेच प्रेमोर्मि भेटतात. संतांची वचने हीच खरी आप्त वाक्ये ओळख पटली की सबंध सृष्टी पालटते. जिवाचे आणि प्रभूचे मूळचे जिव्हाळ्याचेच नाते आहे पण ते कळायचे मात्र संतवचनाने "राहीन आता तुमच्या संगे"—निळोबाराय.

भक्तीच्या मूळाशी प्रेमाची भावना असते असे आपल्याला दिसून येते. प्रेम म्हणजे ईश्वराने मानवाला दिलेली महान देणगीच होय. जेव्हा हे प्रेम ईश्वराकडे वळविले जाते तेव्हा त्याला 'भक्ति' म्हणतात आणि जेव्हा प्रेम ऐहिक, भौतिक, अनित्य पदार्थाकडे वळविले जाते व जेव्हा ते या पदार्थांतच अडकून पडते तेव्हा त्याला 'आसक्ति' हे मात्र नाव देतात. आसक्तीतून मोह उत्पन्न होतो आणि मोहामुळे मनुष्य दुःखात पडतो. म्हणूनच मनुष्यानी आपल्या हृदयातील प्रेमाचा प्रवाह ईश्वराकडे वळविला पाहिजे आणि ईश्वरावर अनन्य प्रेम केले पाहिजे.

गुरु, संत आणि वैष्णव हे शब्द आपण पुष्कळ वेळा सारख्याच अर्थाने वापरतो, वास्तविक त्यात कितीतरी वेगळाली रूपे सामावलेली आहेत. गुरु तो की जो आपली इंद्रियादृत सर्वत्र पहाण्याची दृष्टि ज्ञानावर नेणारा, ज्ञानच सर्व कर्मे नटले आहे ही नजर स्थिर करणारा. सर्व ज्ञानाचे आकर्षण (गुरुत्व) अनुभवात प्रगट करणारा तो गुरु होय. गुरुबोधाने, प्रसादाने जीव इंद्रिये व विषय यांनी ओढला जाणार नाही.

संत ते की, प्रेमाचा बोध ज्यांच्या वचनासरशी, दर्शनासरशी आपणाला भेटतो. संत हे प्रेमाचे आषक असून प्रेमावर ते आपली नजर तेव्हाच नेतील. पण—वैष्णव ते की संत असून ज्यांच्या देहावर त्या प्रेमबोधाची प्रत्यक्ष क्रिया सगुण नांदत आहेत. सर्व कर्मांत प्रेम लुटणारा आणि पूर्ण सांसारिक तोच वैष्णव असतो.

संत संसारिक असतीलच असे नाही. त्यांच्या देहावर प्रेमाच्या क्रिया व्यक्त असतीलच असे नाही. पण वैष्णव हा निश्चयाने सांसारिक म्हणजे स्वदेहावर सर्व कर्मे प्रेमाचे सगुणत्व म्हणून असणारा असाच असणार.

वैष्णव हे संत असतात गुरु पण असतात. पण गुरु अगर संत हे असतीलच असे नाही.

संन्यासी ब्रह्मचारी कितीही प्रेमाची भाषा बोलत असले तरी ते वैष्णव होऊ शकणार नाहीत. वैष्णव हे पराप्रमेय, प्रमदाविलासी असतात. श्री ज्ञानेश्वर माऊली पुरुषाच्या स्त्री होऊन विठूच्या विरहात विरहिणी झाल्या हा त्यांचा संसार वैष्णवाचा होता. जपी तपी वेदांती इत्यादींना वैष्णवत्व भेटणे अत्यंत दुर्लभ. श्रीमंताची राणी होऊन सासरी पावडरी स्नो यांची गोडी तिला वाटली नाही. तीच माहेरी आईने

डोळयाची वात करून मुलीसाठी वाट पाहता पाहता शिकेकाई जतन करून ठेवली. ती अंगाला खरखरली तरी ती मुलीच्या जीवितापर्यंत प्रेमाने पावली.

संतांच्या गावी जाण्यास कष्ट वाटले तरी तेथे जे प्रेम-सुख लुटले त्याने त्या शिकेकाईप्रमाणेच सर्वांग निवले गेले खरे. श्रीमंत सद्गुरु लाईबाबा संतांचा मुकुटमणी, प्रेमबोधाचा पुतळा, जीवाचा मूर्तिमंत कळवळा, तो आमचा सोयरा झाला. आमचा जीव मन बुद्धि ऐश्वर्याची सर्व सोय लावण्याचा भार त्यांनी घेतला, असे ते आमचे सोयरे. आमच्या भाग्याचे आम्ही आपणही काय वर्णन करावे ?

आईच्या अंगावर हवे तसे लोळावे, हट्ट करावा हेच बाळाचे भाग्य. बाळ कर्मात अपूर्ण–पण त्याचे अपूर्णत्व हेच भक्तिभाग्य भोगण्याचे पूर्णत्व–एक आईचा जिव्हाळा असल्याने होते.

संतच आपली माय आणि बाप असे एकच अंगी पूर्णछत्र असल्यावर आपणाला अपूर्णच राख, तेणे प्रेमाचे पूर्णत्व भोगीव अशी संतदेवांना प्रार्थना केली पाहिजे. श्री गुरुराजामुळे आपली चूक घडावी ( मुद्दाम करावी असे नव्हे ) म्हणजे ती चूकच आशीर्वाद भेटविते आणि आपले अपूर्णत्व प्रेमापर्यंत पूर्णतेला जाते.

बाळ खेळात रंगते पण त्यापेक्षाही खेळाच्या निमित्ताने आई आपणात मिळणे हे बाळाला अत्यंत आवडते. खेळाच्या ऐन मोक्याला, चेंडू नेमका गळ्हात कसा जातो तेथे आईने नजर ठेवली नाही म्हणजे बाळाच्या आनंदात, जीवीताल आई विरली नाही तर बाळ आपले अंगहि ( आईचे मूर्तिमंत प्रेम ) झुगारून खाली टाकून देते. आई ती की जी आपल्या दृष्टीच्या पाळण्यात बाळाला घालून प्रेमस्मृतीच्या दोरीने त्याला अखंड हलविते. आईला एकेक दिवस वेगळाला मागावयाचा नसतो. ‘ आई ’ या वचनसिद्धीत आईने आपले जतन केलेले सर्व धन, सर्व जीवित समर्पण केले असते.

संतवैष्णवांना आपण ‘ माऊली ’ या वचनात वाणीदर साठविले की त्या आईने आपणाला सर्व काही दिलेच म्हणून समजावे. त्या धनाची खाणी प्रसंगात हळूहळू उघडेल तेव्हा त्या ‘ माऊली ’ उच्चाराचे सामर्थ्य ध्यानी येईल.

> संतसंगतीचें काय सांगूं सुख । आपणपारिखें नाहीं तेथें ॥
> साधु थोर जाणा साधु थोर जाणा । साधु थोर जाणा कलियुगीं ॥
> इहलोकीं तोचि सर्वांभूतीं सम । शरीराचा भ्रम नेणें कदा ॥
> नामा म्हणे गाय दूध एक सरे । साधु निरंतर वर्ते तैसा ॥

माऊली हा शब्दच प्रियेच्या क्रियेचा मुकुट आहे. मुकुट हे विशेषणसुद्धा माऊली शब्दाला पुरत नाही. कारण मुकुट पाहणारा त्यापासून निराळा राहतो. ज्या

# गणेश शरणं शरणं साईशः

—डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा :–श्री साई क्लिनिक
चितारओळ: नागपूर–२
पिन : ४४०००२ महाराष्ट्र

वाचकांनो ! पुरातन काळाची गोष्ट.

शिव-पार्वती कैलास पर्वतावर विराजमान आहेत. पार्वती उर्फ गिरिजा कोणत्या-तरी कारणास्तव खिन्न आहेत. उदासीनतेची छटा त्यांच्या मुखकमलावर आच्छादित आहे. तेजपुंज सूर्य ढगाद्वारे आच्छादिला जातो तशी त्यांची स्थिती आहे. तेव्हा श्री शिवभगवंत तिला उद्देशून म्हणतात :—

" देवी शक्ती ! तुझ्या अप्रसन्नतेचे कारण काय ? मी कोणता अपराध केला ? तू तर अखिल ब्रह्मांडाची माता आहेस. हे महाशक्ती ! तुझ्या शिवाय आम्ही दुबळे आहोत. तिन्ही लोकात तुझे वर्चस्व गाजते. अस्तु, आता प्रसन्नवदन देदीप्यमान छटा तुझ्या मुखकमलावर पूर्ववत झळकू दे. हे आनंदमयी, भवानी भगवती आम्हा सकलांचे दुःख दूर करण्यास तूच पूर्णतः समर्थ असून; आम्हास उपलब्ध होणाऱ्या प्रेरणेचे स्त्रोत तूच आहेस. तुझ्या खिन्नतेचे कारण सांगून त्याच्या निवारणाची उपाय योजना तूच आम्हास प्रेरित करावी. "

त्यावर माता पार्वती प्रत्युत्तरल्यात :—

" हे नाथ ! खरंच काय आपण माझ्या दुःखापासून अनभिज्ञ आहात ? संसारात संतान–हिन असण्यासारखे दुसरे दुर्भाग्य कोणतेच नाही. मागील 'सती' रूपी पूर्वजन्म मला मुलबाळ वगैरे न होता व्यर्थच वाया गेला. हे देवाधिदेव महादेव ! आता या जन्मीसुद्धा पुत्रोत्पत्तीची काहीच आशा दिसत नाही. पुत्रच नसेल तर संसारातील सर्व ऐश्वर्य तुच्छ आहेत. पुत्रोत्पत्तीद्वारेच शुभ कर्मांचे फल प्राप्त होणे शक्य आहे. " — असे म्हणून माता पार्वती ओक्शाबोक्शी रडू लागल्या.

तेव्हा शिवशंभु प्रभुंनी त्यांना गुह्यातिगुह्य रहस्यमय अशा मंगलमय व्रताची महिमा सांगितली.

श्री शंकर भगवान म्हणाले :—" हे गिरिजे। आम्ही तुला असे व्रत सांगतो की ज्याद्वारे त्रिभुवनाची सर्व कार्ये यशस्वीरित्या निर्विघ्नपणे पार पडतात. ब्रह्मा, विष्णु व मी स्वतःसुद्धा ज्यांच्या वंशाल असतो आणि ज्याची सेवा करतो ते आमचे गुरू अर्थात् गणपति आहेत. ते सर्व दुःखाचा नाश करून सुख उपलब्ध करून देण्यास समर्थ आहेत. त्यांची सेवा कधीच निष्फळ होत नाही. तू जर निदान एक वर्षपर्यंत तरी मनोभावे त्यांचे व्रत केलेस तर तुझे मनोरथ निश्चितच सफल होईल — हा माझा दृढ विश्वास आहे. हे देवी! त्यांचे नावच परम सुखदायी व आनंददायक असून मनास चिरस्थायी शांति सहज प्राप्त करून देते.

माता पार्वतीने उत्सुकतेने विचारले :—

" प्राणनाथ। ते व्रत कोणते बरे ? ते आपल्या पावन मुखकमलाद्वारे ऐकण्यास माझे मन आतुर झालेले आहे."

श्री भोलेनाथ त्या परम–पवित्र व्रतासंबंधी माहिती देताना माता पार्वतीस सांगतात :—" हे भवानी ! त्या मंगलदायक व्रतास 'गणेश–चतुर्थी'— असे म्हणतात. अंगारिका चतुर्थीपासून साधकाने ते व्रत धरावा. दर कृष्णपक्षाच्या चतुर्थीस व्रत पाळून चंद्रोदयानंतरच पवित्रता पूर्वक पूजा करावी. हे व्रत सर्वश्रेष्ठ असून याचे माहात्म्य सर्वोच्च प्रतीचे आहे. हे प्रिये !

राजा शेषसेनाने या व्रताद्वारे आत्मानंद उपभोगिला. मनुपत्नीस या व्रताद्वारे दोन पुत्र झालेत. कर्दमपत्नीस कपिल नामक विष्णुअवतार याच व्रताद्वारे प्राप्त झाला. वशिष्ठांच्या पत्निस याच व्रताद्वारे शक्ती नामक पुत्राची प्राप्ती झाली. अनेकांना अशाच प्रकारे या व्रताद्वारे मनोवांछित फळ मिळालेले आहे.

**'विद्यार्थी लभते विद्यां–धनार्थी लभते धनम्।**
**पुत्रार्थी लभते पुत्रा–मोक्षार्थी लभते गतिम्॥'**

तू सुद्धा हे व्रत करावे—हेच माझे सांगणे आहे. त्याद्वारे तुझीसुद्धा मनोकामना पूर्ण होईल हे निश्चित."

वाचकांनो ! तदनुसार माता पार्वतीने भगवंताचे त्याबाबत खुलासेवार विवेचन ऐकून वरील व्रत एका वर्षापर्यंत केले, व स्वतः गणपति महाराजांनी ब्राह्मण रूपात येऊन त्यांना पुत्रप्राप्तिचा आशिर्वाद दिला. स्वतः श्री गणपतिप्रभुस शिव–पार्वतीचे पुत्र बनण्याची सदिच्छा पूर्वीपासूनच होती. म्हणूनच ब्राह्मणरूपात येऊन आशिर्वाद देताक्षणीच स्वतः बालरूप धारण करून शिव–पार्वतींच्या पलंगावर ते खेळू लागले.

श्री गणपतिच्या उत्पतिनंतर फार मोठा उत्सव थाटाने साजरा करण्यात आला. सर्व देव–देवतांनी शिव–पार्वतींकडे येऊन त्यांना आशिर्वाद दिले. असेच एकदा

सूर्यपुत्र शिवभक्त शनिदेव भेटीस आले असता व त्यांनी बालस्वरूप गणपतिकडे वक्रदृष्टिने न्याहळल्यामुळे श्री गणपतिचे डोके मानेपासून वेगळे तुटून पडले. अशी आख्यायिका शिवपुराणच्या चतुर्थ खंडातील एकोणीसाव्या अध्यायात सापडते. निरनिराळ्या शास्त्र-पुराणात याविषयी निरनिराळे उल्लेख व मतभेद आहेत.

त्यानंतर भगवान विष्णूनी देवाधिदेव शिवजींच्या आदेशान्वये पुष्पभद्रा नदीच्या तटावर उत्तर दिशेस डोके करून झोपलेल्या हत्तिणीच्या पाठीमागील पडलेल्या पिल्लाचे शिरच्छेद केले व ते डोके आणून पार्वतीस दिले. ते त्यांनी गणेश-जीच्या धडास जोडता क्षणीच ते पुन्हा जिवंत झाले. सर्व देवांनी याप्रसंगी नृत्य व मंगलगायन केले. श्री गणपतिंची विधीवत पूजा करण्यात आली व सर्वांनी आशिर्वाद दिले की :—

" कोणत्याही कार्यप्रसंगी सर्वप्रथम आपली पूजा केली तर ते कार्य निर्विघ्नपणे पार पडेल. ब्रह्मज्ञान व ऋद्धी-सिद्धी आपल्या आश्रयात राहतील. "

श्री गणेशजीस त्याप्रसंगी निरनिराळ्या नावाने संबोधिले गेले :—" लंबोदर, विघ्नेश, हेरम्ब, गजवदन, एकदन्तं, शूर्पकर्ण, गणेश, विनायक, वक्रतुण्डं, कृष्ण-पिंगाक्षं, गजवक्त्रं, विकटमेवच, विघ्नराजेन्द्रं, धूम्रवर्णं, भालचंद्रं, गजानन " इत्यादि.

निष्कामत: नियमपूर्वक नित्यनियमित प्रात:काळी शिव-पार्वतीस त्यांचे पुत्र स्कन्द व गणपति हे दोघेही आपल्या मातापित्यांना नमन करायचे. दोन्ही बंधु समवयस्क असल्याकारणाने शिवपार्वतीनी त्या दोघास असा आदेश केला कीं :— " तुमच्यापैकी जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करून प्रथम परत येईल; तो सर्वप्रथम विवाहास पात्र ठरेल. "

स्कंदतर हे ऐकल्याबरोबर त्वरित पृथ्वीप्रदक्षिणेस निघून गेले. परंतु श्री गजानन जरा विचारात पडले. कारण धूम्रवर्णम् लम्बोदरास कोणत्याही कामास घाई करणे मुळीच अवडत नसे. विनायक जे काम करायचे ते विचारपूर्वक शांततेने हळू हळू करायचे. शिवाय वक्त्रतुण्डांस-त्यांचे मंगलमय स्थूलशरिरास ते झेपणेही अशक्यच होते. ते स्वत:च्या मातापित्यांना ईश्वर मानून सेवा करायचे. त्यांना एक युक्ती सूचली. त्यांनी आंघोळ वगैरे आटोपून महादेव-पार्वती समोर साष्टांग दण्डवत घातले व त्यांना विनंती केली कीं :—" देवा आपण आसनावर विराजमान व्हावे. आम्ही आपली पूजा करू इच्छितो " तद्नुसार शिव-पार्वती आसनावर बसले. श्रीगणपती महाराजांनी यथा विधी पूजा करून त्यांना परिक्रमा घातली. तेव्हा विश्वेश्वर भोलेनाथ म्हणाले :—" हे गणेश। स्कंदतर केव्हाचा पृथ्वीप्रदक्षिणेस निघून गेला. आता तूं सुद्धा त्वरित निघावे ॥

यावर श्री गजानन प्रत्युत्तरले :––

" देवा ! वेद आपणास त्रिभुवनाचे स्वरूप मानतात. शिवाय वेदात हेहि सुद्धा म्हटलेले आहे कीं जी व्यक्ती आपल्या आई–वडीलांची परिक्रमा करते त्यास पूर्ण संसाराच्या परिक्रमेचे फळ प्राप्त होते. पुत्रासाठी आई–वडीलांचे पावन–चरणाचे सर्वोत श्रेष्ठ तीर्थ मानले गेले आहे. भगवान ! वेद जर सत्य आहेत तर मी पृथ्वीचीच काय त्रिभुवनाची परिक्रमा संपविली आहे. आता एकतर आपण स्वतःच वेदमार्ग त्यागावा किंवा मज विजयी घोषित करून माझे लग्न तरी करावे. "

असले चातुर्यपूर्ण वचन ऐकून श्रीशंकर-पार्वतीस आपल्या बाळाचे कौतुक वाटले व त्यांना प्रसन्नताही झाली. ते म्हणाले –– " हे गणेश ! तूज शुभमति उत्पन्न होऊन तू हे जे ' धर्म वाक्य ' म्हटलेस ते इतर शास्त्र, पुराण, वेदासारखेच विश्वास योग्य प्रमाणित मानले जातील. त्यानुसार आम्ही सर्वप्रथम तुझेच लग्न करण्याचे ठरविले आहे. श्रीशिवजींच्या आदेशान्वये विश्वरूप यांनी आपल्या दोन पुत्री सिद्धी व ऋद्धि बरोबर श्री गणपतिचे लग्न थाटाने पार पाडले. कालां-तराने श्री गणपतिस पुत्र लाभ झाला. सिद्धी पासून ' क्षेम ' व ऋद्धिपासून ' लाभ ' नामक पुत्र उत्पन्न झाले. समस्त संसारात व अखिल ब्रह्मांडात त्यांच्यासारखा पंडीत व कलाकार अद्याप झालेले नाही––असे आपल्या संस्कृतीच्या शास्त्रपुराणात वर्णिले गेले आहे.

श्री स्कन्दजी पृथ्वी परिक्रमा करून आल्यावर श्री गणेशजींच्या चातुर्यास व बुद्धीकौशल्यास पाहून स्वतःस अयोग्य समजून त्यांनी वनगमन केले. श्रीक्षेत्र मल्लीकार्जुनास त्यांचा कायमचा वास आहे––असे म्हणतात. श्री मल्लीकार्जुन हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. दर पौर्णिमेस भगवान श्री शंकर मल्लीकार्जुनास भेटावयास येतात––अशी आख्यायिका प्रचलीत आहे. त्याकारणाने सर्व देवता–देवी–गन्धर्व–किन्नर–ऋषी–मुनि दर पौर्णिमेस श्रीशंकरांच्या आगमनानिमित्त तिथे उपस्थित राहतात––अशी दृढ भावना आहे. भक्तवर्गांना श्री मल्लीकार्जुनाचे पौर्णिमेस घडलेले दर्शन पापनाशक समजले जाते.

एकदा श्री गणेश भगवान देवर्षि व्यासजींच्या आश्रमात; त्यांनी केलेल्या आव्हानाच्या प्रतिसादरूपाने, प्रगट झाले.

व्यासजी महाराज श्री विनायकास विचारतात :––

" देवा लम्बोदरा ! मला भागवत शास्त्र रचण्याची प्रेरणा स्फुरलेली आहे. परंतु ते लिहिणार कोण ? मला एका शिघ्र–लेखकाची आवश्यकता भासत आहे. "

श्री गणपति म्हणाले :— "मुनिश्रेष्ठ! ही फारच आनंदाची गोष्ट आपण सांगितली. आपण बोलत जावे, मी स्वतः ते लिहून काढेन. त्यागोदर एक गुपित गोष्ट आपणास सांगणे विशेष. ती म्हणजे—इतर सर्व कामे मी जरी हळूवारपणे करीत असलो तरी माझे लिखाण इतके जलद असते की मी मग मुळीच थांबू शकत नाही. या कारणे मी लिहिताना आपणास विचार करण्यास मुळीच वाव मिळणार नाही."

श्री व्यासजींवर माता सरस्वतीचा वरदहस्त होताच, ते चातुर्याने म्हणाले—"भगवंत! मी जे जे म्हणेन ते ते लिहिण्याअगोदर योग्य वा अयोग्य ते आपणच ठरवावे व जे आपल्या बुद्धीस योग्यतम् वाटेल तेच लिहीत जावे."

वाचकांनो! श्री गणपतीजी लिहिताना एक क्षणसुद्धा थांबावयास तयार नव्हते. त्यांचे वाहन 'उंदीर' आहे, उंदीर अर्थात उद्योग. जो उंदीरावर म्हणजे उद्योगावर बसतो, सिद्धी व बुद्धी त्याची दासी बनते. मग ऋद्धि-सिद्धी तर श्री गजाननाच्या पत्नी. सतत निरंतर उद्योग करणाऱ्यास ऋद्धि-सिद्धी सदैव सहाय्य करीत असतात.

प्रत्येक कार्यागोदर 'गणेश पुजन' अद्याप केले जाते. श्री गणपतीजी विघ्नहर्ता आहेत. श्रीगणपतींची आराधना करणे म्हणजेच जितेन्द्रिय होण्याचा प्रयत्न करणे.

श्री गणेश म्हणतात —"मी कामाशिवाय रिकामा कधीच बसत नाही!" जो सदासर्वदा कार्यरत राहातो त्याचे कधीच अमंगल होत नाही.

वाचकांनो! आता मी आपले लक्ष परमपूज्य श्री नरसिंहस्वामीकृत "श्री साई-बाबाज चार्टर्स एन्ड सेईंग्ज" मधील घटना क्रमांक १७२ व "श्रीसाई वचनामृत" मधील घटना क्रमांक १२१ कडे आकृष्ट करू इच्छितो.

'बान्द्रयाची एक महिला जिचे डोके मागील सात वर्षांपासून सतत दुखत राहायचे, शिर्डीस श्रीसाईंच्या दर्शनास्तव आली. श्री बाबांनी आपल्या हस्तस्पर्शाद्वारे त्याच क्षणापासून तिची डोकेदुखी कायमची बंद केली.

तिला श्रीसाईमाऊली म्हणाली —"तू मागील अनेक वर्षांपासून मला नैवेद्य अर्पितेस. मी तुला तुझ्या बालपणापासून ओळखतो." श्री साई समर्थ महाराजांचे हे वचन ऐकून त्या स्त्रीस मोठे आश्चर्य वाटले. तिने स्वतःच्या उभ्या आयुष्यात श्री साईनाथांनाच काय तर त्यांचा फोटो देखील पाहिला नव्हता. मग "श्री बाबा मज लहानपणापासून कसे काय ओळखतात? व मजद्वारे लाविले जाणारे नैवेद्य त्यांना कसे काय अर्पित झाले?"— हे तिला एक गूढच वाटले.

आश्चर्यचकीत मुद्रेत त्या स्त्रीने श्री साईंस विचारले :—" बाबा! हे कसे काय शक्य आहे? ही तर माझी शिर्डीची पहिलीच खेप आहे."

श्री साईबाबा :–" आई! जरा विचार करून सांग बरे. तुझ्या सासरवाडीस कोणत्या देवतेचे पूजन होते; ते तर."

स्त्री :–" गणपतिचे."

साईबाबा :–" आणि तुझ्या माहेरी कोणाचे?"

स्त्री :–" गणपतिचे."

साईबाबा :– " या दोन्ही ठिकाणी पूजा तूच करीत होतीस ना?

स्त्री :–" होय बाबा."

साईबाबा :–" व नैवेद्य अर्पण केल्या शिवाय तुझी पूजाच संपायची नाही; हे खरे आहे ना?"

स्त्री :–" होय बाबा! हे अगदी सत्य आहे. श्री गणपतीची पूजा मी नैवेद्य अर्पण केल्याशिवाय कधीच काय कधीच केलेली नाही. माझ्या माहेरची व सासरवाडीची सर्वच मंडळी श्री गणपती देवतेचीच उपासना करतात."

श्री साईबाबा :–" अग आई! गणपतीस तू अर्पण केलेले सर्वच्या सर्व नैवेद्य मलाच मिळाले. म्हणूनच म्हणतोय ' तू माझ्या ओळखीची म्हणून."

वरील घटनेवरून एकच निर्विवाद सत्य उघडकीस येते की —

श्री साईनाथ म्हणजेच गणपती व गणपती म्हणजेच श्री साईमाऊली.
म्हणूनच कदाचित –

" गणेश शरणं शरणं साईशः।
साईश शरणं शरणं गणेशः॥

ही मंगलमय–पतित-पावनध्वनि आपल्या कर्णेन्द्रियांवर वारंवार आदळत असल्याचे आपणास जाणवते.

◆◆◆◆◆◆◆◆

# तुमचे श्रीसाईबाबाविषयक सामान्य ज्ञान किती आहे?

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला, मुंबई ४०० ०७०

१) अल्पलोभी मारवाडी जेव्हा बाबांना भेटायला आला तेव्हा त्याच्या खिशात ...... रु. होते. (अ) ५००, (ब) २५०, (क) १००, (ड) ५० रु.

२) डॉक्टर पिल्ल्यांच्या नारूग्रस्त पायावर......... यांचा पाय पडला.
(अ) मेघा, (ब) शामा, (क) काकासाहेब, (ड) अब्दुल.

३) उदी व आरती घेऊन बाबांनी बापूगीरला......... पाठविले.
(अ) नाशिकला, (ब) जामनेरला, (क) मनमाडला, (ड) नांदेडला.

४) साठ्यांच्या श्वशुरांचे आडनाव......... होते.
(अ) दिक्षीत, (ब) चांदोरकर, (क) केळकर, (ड) देव.

५) मेघा बाबांना.........मानीत असे.
(अ) गणपती, (ब) शंकर, (क) मारुती (ड) राम.

६) रामदासी भजनी मेळा......... हून आला होता.
(अ) मद्रास, (ब) नागपूर, (क) खांडवा, (ड) रायचूर.

७) "बनता बनता बनेल" असे बाबा......... म्हणाले.
(अ) चांदोरकरांना, (ब) म्हाळसापतींना, (क) नूलकरना, (ड) महाजनींना.

८) संन्यासी विजयानंद.........येथे मरण पावला.
(अ) शिर्डी, (ब) रहाता, (क) मद्रास, (ड) नाशीक.

९) शिर्डीला दर.........बाजार भरतो.
(अ) सोमवारी, (ब) गुरुवारी, (क) रविवारी, (ड) शनिवारी.

१०) सिद्दीकी फाळके.........येथला रहिवासी होता.
(अ) मक्का, (ब) मदीना, (क) हैद्राबाद, (ड) कल्याण.

## उत्तरे

१) –ब, २) –ड, ३) –ब, ४) –क, ५) –ब, ६) –अ, ७) –अ, ८) –अ, ९) –क, १०) –ड.

☆

# ००० सद्गुरू साई – साधना ०००

— श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे,
शिवाजी नगर, पुणे-५.

● 'साधना' अतिशय साधा, सोपा अन् सुटसुटित शब्द परंतु त्यात महान् अर्थ सामावलेला आहे. एखाद्या वस्तुच्या प्राप्तीसाठी केलेला प्रयत्न म्हणजे साधना, अशी साधनेची थोडक्यात व्याख्या करता येईल.

जगाच्या पाठीवरील प्रत्येक माणसाची एकच इच्छा असते, मला सुख कसे मिळेल ? आणि या इच्छा-पूर्तीसाठी तो आयुष्यभर झटत असतो. परिस्थितीशी झगडत असतो. रात्रं दिवस राबत असतो. सुखासाठी धडपडत असतो. आज ना उद्या सुख मिळेल या आशेवर नित्य जगत असतो. अल्प-स्वल्प सुख मिळाले तरी तो त्यावर तृप्त नसतो. त्याला तहान असते प्रदीर्घ सुखाची, सुख हेच जीवनाचे साध्य होऊन बसते. नित्य, पूर्ण आणि अनंत सुखाची प्राप्ति हीच त्याच्या जीवनाची ध्येय-धारणा होऊन बसते.

जीवन हे क्षणभंगूर आहे. आळवावरच्या पाण्यासारखं नाशवंत. केव्हा श्वास बंद होईल, सांगता येत नाही. अशा या जीवनात माणसाने ऐहिक सुखाच्या मृगजळा मागे धावणे मूर्खपणाचे आहे. कळत न कळत माणसाच्या हातून हा मूर्खपणा घडतो हे मात्र तितकेच खरे.

चिरंतन सौख्याची प्राप्ति हवी असेल तर एकमेवं शाश्वत मार्ग आणि तो म्हणजे परमेश्वराची साधना. आपल्या इष्ट देवताची आराधना. मनोमन, नित्य-नियमाने केलेली देवाची प्रार्थना. साधु-संतांनी आणि महंतांनी सांगितल्याप्रमाणे परमेश्वर एकच आहे. परंतु त्याने अनेक रूपे धारण केली आहेत, आणि मानवाने आपल्या बुद्धीला अनुसरून पूजा-पठनाचे भिन्न-भिन्न मार्ग आचरणात आणले आहेत. वास्तविक पाहता सर्व भक्तीचे आणि साधनेचे इच्छित फळ एकच आहे आणि ते म्हणजे ईश-प्राप्ति व त्याद्वारे मानसीक चीरशांती. सर्व रस्ते एकाच ठिकाणी येऊन मिळतात त्याप्रमाणे भक्ति व साधना यांचे इष्ट-ध्येय एकच होय.

साधना करावयाची झाली तर त्यासाठी श्रद्धा आणि सबूरी यांची नितांत आवश्यकता आहे. श्रीसद्गुरू साईनाथ महाराजांचीच ही शिकवणूक आहे. भक्तांवर किंवा साधकांवर अनेक संकटे ओढवतील परंतु मन विचलीत होता कामा नये, श्रद्धा

ढळता कामा नये, आणि या गोष्टीवर ज्यांनी विजय संपादन केला त्याच्या पाठीशी परमेश्वर उभा राहिलाच म्हणून समजा. दुःख आणि संकटांच्या अंधःकारातून सौख्य आणि आनंदाच्या प्रकाशाकडे जावयाचे तसेल तर अंतःकरणात श्रद्धेचा दीप पाजळत ठेवला पाहिजे.

साधनेत प्रगती साधावयाची असेल तर सद्‌गुरूची साथ धरावी लागते. सद्‌गुरूची कृपा व्हावी लागते. श्रीसद्‌गुरू साईनाथ महाराज कृपावंत आहेत. दयाळू आहेत. आई सारखे मायाळू आहेत. आपल्या भक्ताला योग्य मार्गावर नेऊन त्याचे कल्याण साधण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी आहे. श्री साईनाथ नुसतेच सद्‌गुरू नाहीत तर ते ब्रह्मरूप आहेत. सच्चिदानंद आहेत. श्रीबाबांची साधना अतिशय सोपी आहे. श्री बाबांच्या केवळ नाम स्मरणात प्रचंड शक्ति आहे. श्री बाबांची साधना कशी करावी हे सांगावे लागत नाही. श्री बाबाच ती आपल्या कडून करवून घेतात. आपणास योग्य मार्गावर आणून सोडतात.

श्रीसाईनाथ महाराजांची पोथी वाचत असताना मन भरून येते. कधी कधी आसवानी डोळे डबडबून येतात. ही किमया पोथीतील शब्दांची नव्हे तर श्रीबाबांनी आपल्या भक्ताला पर्यायाने साधकाला जीवनाचे धागे–दोरे हळूवारपणे उकलून दाखविले आहेत. छोट्या–छोट्या प्रसंगातून खऱ्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. माणसाने वागावे कसे, बोलावे कसे, उपासना करावी कशी हे न बोलता कियेतून स्पष्टपणे व्यक्त केले आहे. साधकाला पटवून दिले आहे.

सद्‌गुण, सद्‌विचार आणि सत्कर्म या त्रिवेणी संगमाद्वारे जी साधना घडते ती माणसाला स्वर्गीय आनंद देते असे म्हटल्यास अतिशयोक्ति न व्हावी.

श्रीसाईनाथांची साधना करीत असताना श्री बाबांनी सांगितलेल्या अमृत-बोलाचे साधकाने सदैव स्मरण ठेवले पाहिजे. त्याप्रमाणे आचरण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्री बाबा नेहमी सांगत— "सत्य आणि मधूर बोलत जा, दुसऱ्याचे दोष पाहू नका किंवा कुणाची निंदा पण करत जाऊ नका, प्रारब्धाला दोष देऊन निराश होऊ नका किंवा सुखाने हर्षित होऊ नका, कुणाशी वाद घालू नये किंवा कुणाचे वाईटही चिंतू नये, प्राण्यावरसुद्धा प्रेम करीत जा, कुणाकडूनहि फुकट काम करून घेऊ नका, नित्य हरी-भजनात मग्न रहा, दीन-दुबळ्यांना हृदयाशी कवटाळा."

नित्य, सत्य, अनंत, असीम आणि अखंड शांति हवी असेल तर श्रीबाबांनी सांगितलेला मार्ग साधकाला वरदान ठरणारा आहे. शाश्वत सुखाकडे नेणारा आहे.

●

# चिंचवडची श्री मंगलमूर्ती

— श्री. रमाकांत पंडित
प्रभा स्मृती, भाऊ दाजी रोड,
माटुंगा, मुं. १९

● चिंचवडची श्री मंगलमूर्ती हे एक जागृत देवस्थान आहे. मोरया गोसावी यांनी या देवाची या ठिकाणी स्थापना केली व याच ठिकाणी जीवंत समाधी घेतली. या समाधीवर इ. स. १६५९ मध्ये चिंतामणी गोसाव्यांनी मंदिर उभारले. त्यानंतर सात वर्षांनी मंगलमूर्तीचा वाडा उभारला व चिंचवड संस्थानचा प्रारंभ झाला. पुढे सात पिढ्यापर्यंत ही थोर भक्त परंपरा कायम राहिली आणि या सात पिढ्यांच्या दहनभूमीतून एक एक गणपतीची शिळा निघाली तिची त्यांच्या दहनभूमीवर स्थापना केली. या सात समाध्या मोरया गोसाव्यांच्या समाधीजवळ आहेत.

हे देवालय ३० फूट लांब २० फूट रुंद व ४० फूट उंच आहे. बांधणी साधी दगडाची आहे, प्रशस्त सभामंडपातून आत गेल्यावर समाधी आहे या समाधीवर मोरया गोसावींची उपास्य मूर्ती श्री मोरया आहे. समाधी मंदिर व सात समाध्या यांच्या सभोवती ३०० वर्षांचा जुना तट आहे व आजूबाजूला देवळे आहेत व नदीला घाट आहे. समाधीचे दर्शन घेऊन उजव्या हाताच्या वाटेने गावात प्रवेश केल्यावर जवळच मंगलमूर्तीचा वाडा आहे त्याला देऊळवाडा म्हणतात. हा वाडा नाना फडणीस व हरिपंत फडके यांनी बांधला. वसईचा किल्ला सर करण्यापूर्वी गंगाधर नाईक यांनी २१ दिवसांचे अनुष्ठान येथील पवना नदीत केले होते व त्यांना याच गणेशाने तलवार दिली होती व त्या जोरावर त्यांनी वसईचा संग्राम जिंकला.

समाधीवर असलेली मोरयाची मूर्ती मांडी घालून बसलेली, सोंड उजवीकडे असी आहे फक्त दोन हात दृष्टीगोचर होतात. वाड्यातील मंगलमूर्ती हीच मोरया गोसाव्यांना मोरगाव येथे मिळालेली प्रासादिक मूर्ती. या मूर्तीच्या मागील बाजूस दुसरी आणखी एक मूर्ती आहे. तिला कोठारेश्वर म्हणतात. विशेष प्रसंगी मुख्य मूर्ती सभामंडपात बसवितात. त्याचवेळी ही कोठारेश्वर मूर्ती दिसू शकते.

भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला सकाळी चिंचवडहून वाजत गाजत मंगलमूर्तीची पालखी मोरगावी जाण्याकरता निघते पहिला टप्पा पुणे. तेथे तळेगावकर दाभाडे यांच्याकडून किनखाबी पताका व पुजा सामुग्री येते. दुसरा टप्पा सासवड व तिसऱ्या

दिवशी मोरगाव. भाद्रपद याचे प्रमाणेच माघ महिन्यातही श्री मोरयाची स्वारी मोरगावाला जाते पण ती घोड्यावरून जाते. परतताना जेजुरीच्या खंडोबाचे दर्शन घेण्याची वहिवाट आहे.

चिंचवडचा मुख्य महोत्सव म्हणजे मोरया गोसाव्याची पुण्यतिथीचा. मार्गशीर्ष वद्य तृतीयेपासून षष्ठीपर्यंत चार दिवस हा उत्सव चालतो. या चार दिवसात श्रींची मूर्ती भव्य सभा मंडपात आणून सिंहासनावर बसवितात. महाराष्ट्रातील हजारो भाविकजन त्यावेळी येथे जमतात व मंगलमूर्ती मोरयाच्या निनादाने सारा परिसर दुमदुमून जातो. गणेश यात्रेत मोरया गणेश यात्रा सुप्रसिद्ध आहे. या यात्रेस नित्य-नियमाने जाणाऱ्या गणेश भक्तांना गणेश वारकरी म्हणतात. या खेरीज या क्षेत्री द्वार यात्रा म्हणून यात्रा करावयाची असते. मोरगावप्रमाणेच येथेही चार देवता स्थापन केलेल्या आहेत. पूर्वेकडे पिंपरी रस्त्यावर मांजराई व रमा महेश, दक्षिणेकडे वाकड रस्त्यावर आसराई व उमा महेश, तळेगाव रस्त्यावर ओसराई व रतिकंदर्प आणि उत्तरेकडे आकुर्डी रस्त्यावर मुक्ताबाई व महिवरा. श्रावण महिन्यात शुद्ध प्रतिपदे-पासून चार दिवस या चार ठिकाणच्या देवताना थाटात पुजण्यात येते. या यात्रेची मिरवणूक पांढऱ्या पताकानिशी चोपदाराच्या हातात रुप्याची काठी व सोबत छत्री-धारी यांचेसह वाजंत्री वाजवीत निघत असते. मुख्य मंगलमूर्तीच्या पाठीमागे असलेल्या कोढारेश्वर मूर्तीचा उत्सव श्रावण शुद्ध ६ ला असतो. ●

## साभार पोच

[ **श्रीसाई स्तवन व श्रीसाई गौरव स्तोत्र** — कवि श्री. चकोर आजगांवकर, प्रकाशक ताडदेव बुक डेपो प्रकाशन, मुंबई–७. किंमत प्रत्येकी ५० पैसे, पृष्ठे–प्रत्येकी ३२ ]

कवि श्री. चकोर आजगांवकर एम. ए. यांनी आतापर्यंत श्री साईबाबां-च्यावर विविध व विपुल लेखन गद्य-पद्य स्वरूपात केले आहे. नुकत्याच त्यांच्या दोन छोटेखानी पुस्तिका प्रकाशित झाल्या. एकाचे नाव–साई स्तवन, यात निरनिराळ्या वृत्तांत, छंदात साईभक्तीपर उपासना व नवविधा भक्तिपर कवने समाविष्ट करण्यात आली आहेत तर 'साई गौरव' या दुसऱ्या पुस्तिकेत श्रीबाबांचे सुबोध ओवीबद्ध चरित्र स्तोत्र रूपाने दिलेले आहे. श्रीसाई स्तवन केल्याने सर्व संकटांचा नाश होतो म्हणून दिवसातून एकदा तरी श्रीसाई-स्तवनाचे पठण करावे व त्यासाठी प्रत्येक साईभक्ताने ही छोटेखानी दोन्ही पुस्तके आपल्या संग्रही अवश्य ठेवावीत.

— साईनंद

# अनादि अनंताकडे

**श्री. अनिल केशवराव रसाळ,**
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉटर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई – ४०० ०३७.

● ११ वर्षांपूर्वी मी वहिणीबरोबर व एका मित्राबरोबर प्रथम शिरडीला गेलो होतो. श्री साईनाथांची घरी एक छोटी मूर्ति होती. तिला मी रोज सकाळी नेमाने हात जोडत होतो. तो एक उपचार होता ज्यात भक्तिचा अभाव होता. परंतु संतांची ममता ही सर्व ठिकाणी समान असते. म्हणून माझ्यासारख्या मीपणाने भारलेल्या माणसाला बाबांनी शिरडीला बोलावले.

दरवर्षी नियमाने जाई व एखाद्या वर्षी जाणे न झाल्यास फार चुटपुट लागे. आज जेव्हा हा ११ वर्षांचा काळ उजळवतोय तेव्हा आश्चर्य वाटते की केव्हढ्या अनंत अडचणीतून माझ्या गुरूने मला येथपर्यंत आणले. ११ वर्षांपूर्वी मी पणाच्या या खडकाला श्रीसाईरामांचे पाय लागले आणि श्रद्धेची अहिल्या खडबडून जागी झाली.

सुरवातीचा काही काळ स्वताच्या योग्य व अयोग्य इच्छा पूर्ण होण्यासाठी भक्ति करण्यात गेला. कालांतराने लक्षात आले की आपण कोळयासारखे देहातून निर्माण होणाऱ्या इच्छांच्या तंतूंचे घरटे बनवून त्यात स्वतःला गुरफटवून घेतो आहोत. अध्यात्म जाळ्यातून सोडवते ते मुक्त करते — पक्षासारखे आणि मग फरक पडला हा कोळ्याचा देह देवाचे मंदिर झाले व "त्याच्या" इच्छेतच रहाण्याची गोडी निर्माण झाली मानवी देह क्षणभंगूर खरा परंतु तोच अनादि व चिरंतन आनंद मिळवण्याचे साधन आहे हाच जीवनाचा परमार्थ व हाच आपला स्वार्थ ! शबरीने रामाला बोरं उष्टावून दिली कारण त्याने रामाचे तोंड गोड व्हावे ही इच्छा ! भक्ति-मार्गात मी पण सर्व इच्छा पारखू लागलो व ज्या सात्विक आहेत त्याच त्याला पूर्ण व्हाव्या म्हणून विनवू लागलो.

एकाच दगडावर बराच वेळ स्थिर राहून मी "यादे हक" आहे "अनल हक नाही" असे प्रत्यक्ष परमेश्वर असूनही म्हणणाऱ्या माझ्या गुरूने जी लीनता

दिली त्यामुळे तर त्याच्या कृपेच्या समृद्धिचा बहार जसजसा फळू लागला तसतसा हा देह अधिक लीन होत गेला.

फाटके गोधडे व मुंडासे घालून पाच घरी भिक्षा मागून ती एकत्र करुन प्रथम पक्ष्यांना व प्राण्यांना देवून उरलेले आनंदाने खाणाऱ्या गुरुने भूतदया, समचित्तता दिली. वैभवाने मनाचा मोर आता पिसारा फुलवत नाही व ते मिळाले नाही म्हणून खेदाने हिरमुसतहि नाही.

आता दृष्टी स्थिर आहे कासवीच्या पिलांच्या आईकडे अनन्य बघणाऱ्या दृष्टी सारखी श्रीसाईनेच दिलेला हा धडा "आपण कोणाचे तरी व्हावे न कोणाला आपलेसे करावे यापेक्षा अन्यथा असणे बरे नोहे" "देवाकडे आता हीच प्रार्थना की" आता विश्वातके देवे तेणे वाग्ञे तोषावे तोषोनिया मज द्यावे पसायदान —

"जेथे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे,
दूरितांचे तिमिर जावो विश्वस्वधर्म सूर्ये पाहो,
जो जे वांछिल तो ते लाहो सकळ प्राणिमात्र,
विश्वस्वधर्म मंडळी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी,
अनवरत भूमंडळीं भेट तूं भूतां"

॥ ॐ श्री साईनाथार्पणमस्तू ॥

**श्री साईलीला—ऑक्टोबर १९७८ चा खास अंक**

**— श्रीसाईबाबा ६० वी पुण्यतिथी विशेषांक —**

एक ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणार !

आमच्या खास अंकमालीकेतील हा पहिला अंक

आपल्या संग्रही ठेवा.

# "माझा जो जाहला काया वाचा मनी
# तयांचा मी ऋणी सर्वकाळ"

— सौ. शशीकला रामकृष्ण रेवणकर
१५१, रविवार पेठ, कराड

● खरंच बाबा तुमची लीला अगाध आहे. त्याला अंत नाही. जरी बाबा हे जग सोडून गेले, तरी ह्या बोधामृत वचनातून ते आपलं अस्तीत्व जीवंत रूपे साकार करून दाखवत आहेत. अदृश्य रूपे भक्तांना दर्शन देत आहेत. त्यांच्या मनःकामना पूर्ण करून, नवसाला पावत आहेत.

जो खरोखरच मनापासून अनन्य भावे बाबांना शरण जातो त्याचे ते खरोखरच रक्षणकर्ते, पाठीराखे असतात. पण त्या भक्ताच्या अंगी दृढभक्ती, एकाग्रता असली पाहिजे. मग बाबा त्यांचा सर्व भार आपल्या शरीरावर घेतात. भक्तांच्या हाकेसरशी धावत येतात. कितीही दूर हजारो मैलावरून सुद्धा बाबांना भक्तांची करूण हाक ऐकू येते.

मला अचानक ऑगस्ट ७७ मध्ये शिरडीला प्रथमच जाण्याचा योग मिळाला, आणि मी शिरडीत जावून बाबांच्या समाधीचे व त्या नयनमनोहर मूर्तीचे दर्शन घेतले. तेव्हापासून माझ्या अंतःकरणात "साईंची" ती मूर्ती वास्तव्य करून राहिली. खरंच त्यापूर्वी मला एवढी काही बाबांच्या विषयी माहिती नव्हती. पण जेव्हा मी बाबांच्या वास्तव्याने पुनीत (पवित्र) झालेली ती शिरडी नगरी पाहिली, तेव्हा खरंच माझ्या डोळ्यांचं पारणं फिटले. आतापर्यंत मी तशी पुष्कळ मोठमोठी तीर्थक्षेत्रे पाहिली. पण माझं मन कुठेच इतकं रमलं नाही. पण बाबांनी मात्र माझ्यावर जादू करून मला शिरडीत अगदी पक्क बांधून ठेवलं. अक्षरशः मी बाबांच्या दर्शनाने वेडी झाले. पूर्णपणे साईवेडी झाले. त्यानंतर परवाच मी रामनवमीला जावून सहा–सात दिवस राहून आले. तेव्हापासून तर माझ्या ध्यानी, मनी, स्वप्नी सुद्धा साईंचीच मूर्ती तरळत आहे; आणि मला तर ह्या अल्पावधीत (ऑगस्ट नंतरच्या) साईंच्या चमत्कारांचे इतके अनुभव आले ते सर्व तर मला ह्या ठिकाणी सांगणे मुश्किलच आहे. कारण सर्वच जर लिहित बसले तर लिखाण खूपच मोठं होईल, म्हणून फक्त एक–दोन अनुभव लिहित आहे.

बाबा म्हणतात "जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव" मी जेव्हा प्रथम शिरडीहून आले. त्यावेळी माझ्या मैत्रीणीचं छोटं बाळ फिट्सच्या (आकडी)

आजाराने अचानकच आजारी होते. आठवड्यात त्याला तीनदा तसं झालं होतं. मला त्यांनी तसं सांगितल्यावर मी त्याला तात्डतोब बाबांची उदी लावली तोंडात थोडा बाबांचा प्रसाद टाकला व सांगीतलं की तुम्ही बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून बाबांना नवस बोला की ( जर इच्छा असेल तर ) जर माझ्या बाळाला असं कधीच परत नाही झालं तर मी सवा पाच रु. पाठवीन अन् तेव्हा पासून आज पर्यंत त्या बाळाला त्याचा काहींच त्रास नाही. अन् आता तो बाळ चांगला सुदृढ असा १ वर्षांचा झाला आहे. परवाच आम्ही साईकृपेने त्याचा वाढदिवस सुद्धा खुप उत्साहाने साजरा केला. तो आत्ता इतका निरोगी आणि सशक्त आहे की कोणाला सुद्धा सांगून खरं वाटत नाही की ह्या मुलाला लहानपणी असं होत होतं. मग ही सारी बाबांचीच किमया नाही का ?

त्याच प्रमाणे अगदी परवाचाच एक अनुभव. माझ्या ओळखीची एक वयस्क नर्स तिची अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी अचानक हरवली होती, आणि पंधरा दिवस पर्यंत बिचारीने घरात सर्वत्र शोधून, कुणा भटजीला विचारून निराशा करून घेतली. मग माझ्याकडे ती आली. बिचारी खूपच हळहळत होती. कारण बिचारीने खुप कष्ट करून ५० सालापासून नर्सच्या नोकरीतून बचतीतून काही थोडे दागिने केलेले. मला त्यामुळे खुपच वाईट वाटलं मी तिला बाबांची उदी दिली. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. मी सांगितले की तुम्ही पूर्ण श्रद्धा ठेवा, व भक्तिपूर्वक बाबांच्या चरणी लीन व्हा, व म्हणा की पुढील गुरुवार पर्यंत ( १५ दिवसात ) अंगठी मिळाल्यास काही जे मनात येईल ते देईन. अन् नित्य नेमाने बाबांचे स्मरण करून उदी सेवन करा आणि काय आश्चर्य खरोखरच पंधराव्या दिवशी गुरुवारी तिलाच रोज चारदा दात घासणाऱ्या मिश्रीच्या डब्यात अचानकपणे अंगठी सापडली. तो डबा तर दिवसातून चार–पाचदा घरातील सर्व जण उघडत असत. पण त्यावेळी मात्र त्यातून अंगठी निघते म्हणजे आश्चर्यच की नाही. मग बाबांचाच हा चमत्कार नाही का ?

मला स्वतः घरात तर असे पुष्कळ अनुभव आले आहेत. मुलं आजारी असताना अगर कोणत्याही गोष्टीपायी आपण अडलो तर प्रत्येक वेळी बाबांच्या प्रतिमेला नमस्कार करून ( स्मरण करून ) उदी लावली की झालंचं काम फत्ते ! पण मनातून मात्र पूर्ण बाबांच्यावर श्रद्धा, विश्वास पाहिजे हं ! मी ज्या नडलेल्यांना बाबांची उदी देते त्यांना बजावून असे सांगते की तुमचा मात्र बाबांच्यावर पूर्ण विश्वास व दृढभक्ति असेल तरच मग नक्की खात्री बाळगा की बाबा नक्कीच तुमची इच्छा पूर्ण करतील. नाहीतर उगीचच 'मनी नाही भाव, आणि देवा मला पाव' अशाने कधीच बाबा किंवा कोणताच देव पावणार नाही, पण या युगात

जर श्रद्धेने, भक्तीने लौकरात लवकर नवसास पावणारा असा साईसारखा देव शोधून सापडणार नाही.

माझी बाबांचे चरणी हीच प्रार्थना आहे की बाबांची अशीच कायम माझ्यावर व माझ्या कुटुंबियांवर कृपा राहू दे! व मी ज्या नडलेल्यांना बाबांचा महिमा सांगून उदी देते, त्यांना बाबांनी आपला चमत्कारानुभव दाखवावा, अन् बाबा तुम्ही मात्र मला, ह्या तुमच्या वेड्या पोरीला तुमच्या चरणापासून कधीच अंतरू नका? कायम जन्मोजन्मी तुमच्याच चरणी आश्रय द्या.

मी माझे संपूर्ण जीवन बाबांचे चरणी अर्पण करत आहे! फक्त बाबा तुमच्याच आशिर्वादांची आम्हा साईवेड्या भक्तांना गरज आहे.

" श्री सद्गुरू बाबा साई, तुज वाचूनी आश्रय नाही "

## — आत्मसमर्पण —

हे सद्गुरु साईनाथा,
सप्तसूर झंकारुनीया,
मी अंतरीचे गीत गावे
नेत्र किरणातूनी,
अंतरंग मम न्हाऊन जावे
कृपा प्रसादातूनीया,
पुण्यकर्म सारे उजळून जावे
तव दर्शनातूनीया,
विश्वास मी विसरून जावे
आस मम अंतरीया,
जीवनाचे पुष्प बनूनी,
तव चरणी मज वाहून घ्यावे.

—कु. प्रज्ञा सबनीस, मेन कॉलनी,
वालचंदनगर, जि. पुणे.

# • श्री साई समर्था •

श्री साई समर्था । दीन दयाळा ।
मशीदी मध्यें तव सतेज मूर्ती
हास्य विलसत वदनावरती
अखंड ज्योती तेवती सभोंती
दिनरात दिपोत्सव सोहळा ॥ ध्रु ॥
त्या ज्योतीची हीच महती
काय वर्णू मी अल्पमती
जलांत भिजवूनी लाविशी वाती
तुझी अलौकिक लीला ॥ १ ॥
नित्य नूतन तूं चिर पुरातन
श्रद्धेनें तुज साद घालिता
धावूनी येशी साईनाथा
तुज भक्तांचा लळा ॥ २ ॥

— सौ. सुशिलाबाई हजारे
मालेगाव कँप, मालेगाव

# साई तुझ्या भेटीसाठी

देह झिजविला तुझ्या भेटीसाठी
बाबा तुझ्या भेटीसाठी ॥
काम, क्रोध, भूक, तहान विसरुनि गेले
तुझ्या भेटीसाठी ॥
नको लोटू दूर तू बाबा
जवळ घे मज लेकुऱ्याला
तुझ्या भेटीने मन माझे आनंदित झाले ॥
जन्मोजन्मी तुझ्या भेटीसाठी
देह माझा असाच झिजू दे
ही विनंती सुधाची तुझ्या चरणापाशी
तुझ्या चरणापाशी ॥

— कु. सुधा अ. शिवलकर
मांडवी, भडंग नाका, रत्नागिरी

# ●●● "साईची मंगल मूर्ती" ●●●

चाल :– ( मिलो न तुम तो हम घबराये; मिलो तो आप चुराये )

सदैव जगती गाजे किर्ती बघुनि हात जुळती ।
साईची मंगल मूर्ती; साईची मंगल मूर्ती ॥ धृ० ॥

हे साईनाथा, महिमा मी तुझा वर्णू काय रे ?
तुझ्याच दर्शना वळती प्रभू हे माझे पाय रे ।
तुझीच आरती जन हे करती पूजोनी कैक तरती
साईची मंगल मूर्ती; साईची मंगल मूर्ती ॥ १ ॥

तुझ्याच डोईवर केशरी शोभे छान कफनी,
या पुण्य भूमीवर जमले हे सारे मन रंजनी
अशीच दाटी तुझ्याच साठी, सारेच गुण गाती
साईची मंगल मूर्ती; साईची मंगल मूर्ती ॥ २ ॥

सुखी ठेवी भाविका, हे साईनाथा जगन्नायका
ही गीत मालिका अर्पण तुज सुखदायका
धनिक येती, गरीब येति, बघूनी हात जुळती
साईची मंगल मूर्ती; साईची मंगल मूर्ती ॥ ३ ॥

सदैव जगती गाजे किर्ती, बघूनी हात जुळती ।
साईची मंगल मूर्ती; साईची मंगल मूर्ती ॥

— कु. शालिनी सदाशिव देशपांडे
( Sy. B A.)
११, रामदास कॉलनी,
जिल्हापेठ, जळगाव.

## ००० साईगणेश ०००

साई गणेशा बुद्धि प्रकाशा । तुला वंदिते सदा ।
तुझ्या कृपेने सारी आर्ता । भवभयाची व्यथा ॥ धृ० ॥
विघ्नविनाशक मंगलमूर्ति ।
महाकाय मम गणपति ।
सवे घेऊनी परशु हातीं । निरची रे आपदा ॥ १ ॥
हेरंब तूं ॐ कार साई ।
विघ्नहरा तूं सुखदायी ।
तुझ्या कृपेची अम्हां नवाई । नित्य असूं दे सदा ॥ २ ॥
वक्रतुंड हे जगदिश साई ।
आशा वंदिते तंव पायी ।
सौभाग्य सुंदरु ज्ञान देई । मम साई गणेशा ॥ ३ ॥

—सौ. आशा दयानंद इंगळे
जलमंदीर सोसायटी, जे-१३, ब्लॉक क्र.१.
भांगुर नगर, गोरेगाव. मुं. ४०००६३.

## ००० घे साई दर्शन ०००

जा शिरडीला उगीच कशाला ।
करिशी तीर्थाटन । एकदा घे साई दर्शन ॥ धृ० ॥
माया द्वारका प्रेमळ आई
तात जगाचे सद्गुरु साई
धुनी अखंडित प्रसन्न जेथे
अग्नीनारायण एकदां घे साईदर्शन ॥ १ ॥
राम रहिम कुणी म्हणती ज्याला
बुद्ध येशूहि गमे कुणाला
जात पंथना भेद न उरला
मानवता शिकवण एकदां घे साईदर्शन ॥ २ ॥
पूर्ण ब्रह्म हे साई अवतरले
भव भय त्यांच्या दर्शने तुरे
उदी नव्हे तो प्रसाद गुरुचा
संजिवनीचे कण एकदां घे साईदर्शन ॥ ३ ॥

— श्री. व्ही. एस. आकेरकर
साई निवास, मु. पोष्ट पाट, ता. कुडाळ, जि. रत्नागिरी

# ❀ ऋतुचक्र ❀

'मृगा'च्या ह्या वर्षावाने
धरती न्हावुन निघाली
साई नामाच्या भक्तीने
तृष्णा माझी पूर्ण झाली ॥ ध्रृ० ॥

'वसंता'च्या आगमने
अवनी हिरवे वस्त्र ल्याली
बाबांच्या शब्दसृष्टीने
माझी दृष्टी ही बदलली ॥ १ ॥

'ग्रीष्मा'ची कीमया न्यारी
मातीतूनी होती मोती
ओल्या जागी पडती नमाज
परी कपड्यास न लागे माती ॥ २ ॥

'शिशीरा'चा पहा हा आगळा पसारा
मनी वाटे तेव्हा वाहो धुंद बेबंद वारा
दिन-दुबळ्यास मिळे एकच आधार
साई-श्रद्धेचा लावता अंगारा ॥ ३ ॥

असे हे आगळे ऋतुचक्र जोवरी
साईनामाचा महिमा दुमदुमे भुवरी
येथे आढळे मज दिव्यत्वाची प्रचिती
अति आदराने माझे दोन्ही कर जुळती ॥ ४ ॥

—श्री. जगदीश देवपुरकर,
'अबोल'
ग. नं. ५/२६४३
धुळे, (महाराष्ट्र)

## ☆☆☆ "महात्मा" ☆☆☆

शिर्डी झाले मोक्षधाम तेथे परमात्मा
ब्रह्मांडाला व्यापून उरला तो एक महात्मा
भक्तिभाव हा संगे घेऊन पाहू परमेशा
भक्तासाठी प्रकटलेल्या अवतारी पुरूषा
वेष बावळा परी अंतरी याच्या नाना कळा
नाकळती अज्ञजनांना त्या अघटित लीला
सामान्य नसे हो असामान्य तो फकीर
क्षणांत बदलतो हा पहा नशीबाची लकीर
ना जातीधर्म वा कशाचे याला बंधन
सर्व थरातील सानथोर ते करीती वंदन
वैभव सारे पायाशी याला काय कमी
संकल्पानें निर्मिती, हा जगताचा स्वामी
अती कनवाळू याला देखवेना हाहाःकार
अजन्मा प्रभू जन्म घेतो साई अवतार
मुक्तीसाठी कशास आतां ते कष्ट सायास
साईदर्शन होता क्षणीं चुकेल हा गर्भवास
अस्थीर त्याला सश्रद्ध कराया हे चमत्कार
निःसंग हा, नको तयाला मान नमस्कार
प्रेममूर्ती ही प्रेमभुकेली अती जागृत असे
शुद्ध तन–मनीं उमटली साई प्रेम ठसे । ......

— शशिकला साळगांवकर
मुक्ता निवास, १५५ ब,
नवी पेठ, सोलापूर.

# शिरडी-वृत्त

## गुरुपौर्णिमा उत्सव–माहे जुलै सन १९७८

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता आलेल्या भक्तांची व श्रीसाई-बाबांचे दर्शनाकरिता पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा भक्तांची फारच गर्दी झाली होती. हा उत्सव बुधवार दि. १९-७-७८ ते शुक्रवार दि. २१-७-७८ पर्यंत तीन दिवस समाधी मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला.

**गुरुपौर्णिमा उत्सव : पहिला दिवस :** बुधवार दि. १९-७-७८ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाल्यावर सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरु-स्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. श्रींचे मंगलस्नान, अभिषेक पूजा, आरती वगैरे नित्याचे कार्य-क्रमाव्यतिरिक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत श्री. कोपरकर महाराज पुणे, यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९-१५ व ९-३० ते ११ पर्यंत सौ. माणिक भिडे मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते ११-१५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :–** गुरुवार दि. २०-७-७८ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. गुरुवारचा महत्त्वाचा दिवस व उत्सव, त्यामुळे अतिशय गर्दी झाली होती. ५-१५ वा. काकड आरती झाली. सकाळी ६ वा. श्रीसाई-सच्चरित अध्याय वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा-व्यतिरिक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत ह. भ. प. कोपरकर महाराज पुणे यांचे कीर्तन झाले. रात्री ७-३० ते दुसरे दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत कलाकारांचे विविध प्रकारचे कार्यक्रम झाले. रात्रौ ९-१५ वा.

श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक मोठ्या थाटात निघाली. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक, शिरडी सिद्धेश्वर बॅण्ड पथक पुणे. राहाता बॅण्ड पथक, स्थानिक व संस्थान कर्मचाऱ्यांचे लेझीम, सनई, चौघडा, डफ, शिंगवादन, टाळ, मृदंग यांचे गजरात रथाची मिरवणूक गावातून आली.

मिरवणुकीचे वेळी श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्याचप्रमाणे स्थानिक ग्रामस्थानी भारुड गारुड कार्यक्रम केले. कोळी महिलांनी व भाविक भक्तांनी भजन, गायन, नृत्य करून मिरवणुकीला शोभा आणली होती. अशा असंख्य साईभक्तांच्या प्रेम भावनेची मिरवणूक रात्री १२-४५ ला मंदिरात येऊन पोचली व भक्त मंडळी कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाली. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवणेत आले होते.

**उत्सवाचा तिसरा दिवस :—** शुक्रवार दि. २१-७-७८ नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या वस्त्राची प्रसादरुपाने विक्री झाल्यावर संस्थान गवई काव्यतिर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे सकाळी १०-३० ते १२-१५ पर्यंत गोपालकाला कीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर मध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. रमेश पिळणकर व बंधू पार्टीचे निरनिराळे कार्यक्रम झाले. कार्यक्रमात कु. जयश्री शेजवाडकर, श्री. रमेश पिळणकर, सौ. पिळणकर यांचे गायनाचे कार्यक्रम झाले. श्री. अण्णासाहेब पिळणकर व श्री. दिनेश पिळणकर यांचे नकलांचे अप्रतिम कार्यक्रम झाले. श्री. पिळणकर बंधू मुंबई यांनी १० वाजेपर्यंत साईभक्तांची करमणूक केली. १० ते १०-३० पर्यंत शेजारती झाल्यावर गुरुपौर्णिमा उत्सवाची समाप्ती झाली.

कोर्ट रिसीव्हर मा. श्री. क. हि. काकरेसाहेब यांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित राहून उत्सवाची सर्व व्यवस्था उत्तम ठेवली होती.

काही कलाकरांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

कीर्तन :— संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

**प्रवचन** :– १ ) श्री. साईनाथ पा. जोशी, शिरडी.

**गायन, भजन, वादन, नृत्य वगैरे** :– १ ) श्री. अनंत भा. पाले, पंढरपूर. २ ) श्री. भजन मंडळी बांदा सावंतवाडी. ३ ) श्रीमती प्रमिलाबेन म. गुजराथी सुरत. ४ ) श्रीसाईनाथ भजनी मंडळ मुंबई.

५ ) श्री. शिवराम गो. घोगळे, मुंबई. ६ ) श्री. बाळ चावरे, मुंबई. ७ ) श्री. महादेव वि. कवठेकर, मुंबई. ८ ) श्री. जगदीश बॅण्डपार्टी, नागपूर. ९ ) श्री. तुकाराम म. दैठणकर, पुणे. १० ) श्री. विठ्ठल न. देवळणकर, पुणे. ११ ) श्री. गोपाळ द. राहुरकर, पुणे. १२ ) श्री. ए. कि. अंकलेश्वरया, मुंबई. १३ ) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई. १४ ) सौ. माणिक भिडे, मुंबई. १५ ) कु. भिडे, मुंबई. १६ ) श्री. मोडक, मुंबई. १७ ) श्री. अनंत राणे, मुंबई. १८ ) श्री. माधवराव ग. दैठणकर, पुणे. १९ ) श्री. ज्ञानेश्वर मा. दैठणकर, पुणे. २० ) कु. माधवी सु. गुजराथी, शिर्डी, २१) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. २२) सौ. पुष्पा पागधरे, मुंबई. २३) श्री. बाळासाहेब साठे, मुंबई. २४) श्री. मोहन कृ. कलंब, मुंबई. २५) श्री. रुपकुमार राठोड, मुंबई. २६) श्री. जेठालाल एम. शहा, मुंबई. २७) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. २८) श्री. एकनाथ मोतकर, ग्वाल्हेर. २९) श्री. लक्ष्मण द. राऊत, नगर. ३०) श्री. पुरुषोत्तम वि. बावकर, मुंबई. ३१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. ३२) श्री. शामसुंदर मेडा, संगमनेर. ३३) श्री. आर. एस. देशमुख, अमरावती. ३४) श्री. बाबुराव बा. बिडवे, संगमनेर. ३५) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर. ३६) श्री. अशोक ल. जंगम, कोपरगाव. ३७) श्री. सुरेश ल. जंगम, कोपरगाव. ३८) श्री. अनंत दत्तात्रय, कोपरगाव. ३९) श्री. विलास भ. चव्हाण, कोपरगाव. ४०) श्री. दिनकर स. वाणी, कोपरगाव. ४१) श्री. गणेश ल. भागवत, कोपरगाव. ४२) श्री. चंद्रकांत मालकर, कोपरगाव. ४३) श्री. रा. अ. बार्शीकर, नगर. ४४) सौ. नीला प्रभू, मुंबई. ४५) श्री. ज्ञानेश्वर वाबळे, राहाता. ४६) श्री. इनुस शेख, राहाता. ४७) श्री. शशिकांत नागरे, राहाता. ४८) श्री. अहमद खा. पठाण, राहाता. ४९) श्री. बजार शेख, राहाता, ५०) श्री. प्रमोद वहाडणे, राहाता. ५१) श्री. पंढरीनाथ रासने, राहाता. ५२) श्री. शेख एस. टी. राहाता. ५३) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे. ५४) सौ. रश्मी गाडगीळ, पुणे. ५५) श्रीबाल-

गोपाल भजन मंडळ, पुणे. ५६) श्री. पागरकर, पुणे. ५७) श्री. अनिल, पुणे. ५८) श्री. विष्णु आढाव, पुणे. ५९) कु. सुनंदा बाघ, पुणे. ६०) श्री. सदाशिवराव जाधव, मिरज. ६१) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे. ६२) श्री. गुलाब रसूल खान, पुणे. ६३) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ६४) श्री. दामूअण्णा म. दळवी, श्रीरामपूर. ६५) श्री. वसंतराव देवळणकर, पुणे. ६६) श्री. वंडोपंत. सोलापूरकर, पुणे. ६७) श्री. रामचंद्र द. वाडेकर, शिरडी. ६८) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी. ६९) श्री. आप्पा सामंत, मुंबई. ७०) श्री. मधुकर उपाध्ये, पुणे. ७१) श्री. पांडोबा वि. गुरव, श्रीरामपूर. ७२) श्री. रामचंद्र को. बोडके, पुणे. ७३) सौ. जिगरेबाई. ७४) सौ. शांता सरोदे. ७५) श्री. अजय कुलकर्णी, पुणे. ७६) श्री. प्रकाश पवार, पुणे. ७७) श्री. शेख नबाब ड. पटेल, अस्तगांव ७८) श्री. एस. एम. साठे, पुणे. ७९) श्री. शरद निंबाळकर, नागपूर. ८०) श्री. जगन्नाथ वाडेकर, नगर. ८१) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, नगर. ८२) श्री. एकनाथ श. तुपे, चाळीसगाव. ८३) श्री. नागेश ग. दिवाकर, पुणे. ८४) श्री. चंद्रकांत ज्ञा. गुजर, पुणे. ८५) श्री. शामराव मो. मानकर, नागपूर. ८६) श्री. नामदेव पु. बोडे, पुणे. ८७) श्री. शिवाजीराव भ. कुरुंदकर, कुरुंद. ८८) कु. खळदकर, पुणे. ८९) श्री. राम खळदकर, पुणे. ९०) श्री. सुनील खळदकर, पुणे. ९१) श्री. महादेव तुपे, पुणे. ९२) श्री. सखाराम रा. गुरव, शिर्डी. ९३) श्री. शाम खळदकर, पुणे. ९४) श्री. अरुण राऊत, पुणे. ९५) श्री. शिवाजी शं. कदम, शिमशेरपूर ९६) श्री. पद्माकर बिडवे, पुणे. ९७) श्री. प्रसाद दूडे, पुणे. ९८) श्री. सुनिल राऊत, पुणे. ९९) श्री. मनोहर ह. लोणकर, पुणे. १००) श्री. बाळासाहेब बिडवे, पुणे. १०१) श्री. शिवाजीराव धुमाळ, मुंबई. १०२) श्री. वसंत दा. रासने, पुणे. १०३) श्री. बाळासाहेब राऊत, पुणे. १०४) श्री. रामानंद स्वामी. १०५) श्री. रघुनाथ सोनार, शिर्डी. १०६) श्री. वेडू परदेशी. १०७) श्री. नल्ल सारंगधर, शिरडी. १०८) ह. भ. प. कोपरकर महाराज, पुणे. १०९) श्री. रमेश पिळणकर व पार्टी, मुंबई. ११०) अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवा मंडळ, गुरुकुंज, अमरावती. १११) सौ. रोशन सुरती, जबलपूर. ११२) श्री भजन मंडळ, जबलपूर. ११३) सौ. सुलभा र. जोशी, मुंबई. ११४) कु. ललिता र. जोशी,

मुंबई. ११५) कु. विद्योत्तमा गुप्ता, कानपूर.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. के. बी. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.

२) मा. श्री. शशिकांत दैठणकर, IAS जिल्हाधिकारी धुळे.

३) मा. श्री. जम्बुनाथन, IAS सेक्रेटरी समाज कल्याण व आदिवासी कल्याणखाते महाराष्ट्र, मुंबई.

४) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुम्बई.

५) मा. श्री. रा. ग. गुप्ते, IAS विभागीय आयुक्त पुणे.

६) मा. श्री. मलहोत्रा, IAS एक्झिक्युटीव्ह ऑफिसर जि. परिषद, अहमदनगर.

**हवापाणी**– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.


**श्रीसाईलीला दिवाळी अंक**

ऐन दिवाळीत भक्तांच्या भेटीस येत आहे

पृष्ठे ९६ किंमत : दीड रुपया

## श्रीसाईबाबांच्या भारतातील मंदिरातील

# ❀ मूर्तींच्या छायाचित्रांचे अपूर्व प्रदर्शन ❀

### मंदिर चालकांना संस्थानची विनंती

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्ताने शिरडी येथे यंदाच्या नवरात्रीच्या काळात एक अपूर्व प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

श्रीसाईबाबांची भारतात ठिकठिकाणी नव्हे तर जगातही मंदिरे आहेत. या मंदिरातून कुशल शिल्पकारांनी बाबांच्या विविध प्रकारे घडविलेल्या नयनरम्य अशा मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. अनेक चित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून बाबांच्या कितीतरी सुंदर प्रतिमा चितारलेल्या आहेत. अशा या मूर्तींच्या व चित्रांच्या छायाचित्रांचे अपूर्व असे प्रदर्शन नवरात्रात संस्थानने योजिले असून साईभक्तांना हे अभूतपूर्व प्रदर्शन पहाण्याची एक दुर्मिळ संधि लाभणार आहे.

श्रीसाईबाबांच्या भारतातील ठिकठिकाणच्या मंदिर चालकांनी आपल्या मंदिरातील बाबांच्या मूर्तीची किंवा प्रतिमांची छायाचित्रे या प्रदर्शनासाठी पाठवून संस्थानला संपूर्ण सहकार्य करावयाचे आहे. या प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात आलेली नाही. मंदिर चालकांनी आपापल्या मंदिरातील मूर्तीचे किंवा प्रतिमेचे छायाचित्र २५ सेंटीमीटर लांब ( १० इंच ) व २० सेंटीमीटर रुंद ( ८ इंच ) या मोजमापाने शक्य तर पिवळसर किंवा क्रीम रंगाच्या माऊंटवर चांगले चिकटवून पाठवायचे आहे. मंदिरात बाबांच्या एकाहून अधिक मूर्ती किंवा प्रतिमा असतील तर त्यांची सुद्धा याच मोजमापात छायाचित्रे माऊंटवर चिकटवून पाठवावीत. काचेच्या फ्रेमसह अजिबात पाठवू नयेत. सर्व चित्रांच्या मागे, चित्रातील मूर्ती कोणत्या मंदिरातील आहे, ती किती फूट उंचीची आहे, तिचा शिल्पकार कोण, चित्रकार कोण, केव्हा स्थापन केली याचा निर्देश असावा.

सर्व छायाचित्रे अधिकात अधिक १५ ऑक्टोबर १९७८ पर्यंत श्री. संपादक श्रीसाईलीला, 'साई निकेतन', ८०४ बी, खोदादाद सर्कल, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर व्यवस्थित पाठवावीत.

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

**वेळ :** रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

**( शामदासानी फौंडेशन )**

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१. संपादक व प्रकाशक : श्री. क. ही. काकरे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.